# पंतप्रधानांच्या संकल्पसिद्धीला बळ देणारा अर्थसंकल्प


आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, ११ मार्च २०२५




आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्या संकल्पपूर्तीला बळ देणारा वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी सोमवारी विधानसभेत सादर केला. 'महाराष्ट्र आता थांबणार नाही.., विकास आता लांबणार नाही...' असे सांगत शेती, शेतीपुरक क्षेत्रं, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास अशा अनेक क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला, 'विकसित भारत-विकसित महाराष्ट्रा'चे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून देशांतर्गत, विदेशी गुंतवणूक, रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील. विधानसभा निवडणुकीत राज्यातील मतदारांनी व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवण्यात अर्थसंकल्प यशस्वी होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचा अकरावा अर्थसंकल्प विधानसभेत सादर करताना व्यक्त केला.**

# दादांचा वादा

मांडणी व सजावट
अतुल द. खंडगावकर

## महाराष्ट्र आता थांबणार नाही! विकास आता लांबणार नाही !!



**संगमेश्वर येथे छत्रपती संभाजी महाराजांचं भव्य स्मारक उभारणार :** छत्रपती शिवाजी महाराजांचं अरबी समुद्रात भव्य स्मारक उभारण्याची घोषणा करणाऱ्या राज्य सरकारने त्या स्मारकाच्या प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात केलेली नाही. अशातच राज्यातील महायुती सरकारने छत्रपती संभाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याची घोषणा केली आहे. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आज राज्यातील नव्या सरकारचा पहिला अर्थसंकल्प सादर केला. यावेळी त्यांनी ही घोषणा केली आहे. यासह हरियाणातील पानिपत येथे मराठ्यांच्या युद्धाचे स्मारक बांधण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचंही जाहीर केले. उत्तर प्रदेशमधील आग्रा येथे शिवाजी महाराजांचं स्मार्क उभारणार असल्याची घोषणा अजित पवारांनी केली.



**मुंबईतील वाहतूक गतिमान होणार :** अर्थमंत्री म्हणाले, "मुंबई उपनगरातील वाहतूक गतिमान व्हावी यासाठी वर्सोवा ते मढ, वर्सोवा ते भाईंदर किनारी मार्ग, मुलुंड ते गोरेगाव, ठाणे ते बोरीवली आणि ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्ग असे ६४ हजार ७८३ कोटी किमतीचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा उन्नत मार्ग बांधण्याचं नियोजन असून त्याद्वारे ठाणे, डोंबिवली, कल्याण व इतर महत्त्वाची शहरं विमानतळाशी जोडली जाणार आहेत." तसेच, बाळकुंभ ते गायमुख या ठाणे किनारी मार्गाची लांबी १३.४५ किमी असून त्याचे ३,३६४ कोटींचे खर्चाचे काम २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचं नियोजन असल्याचं अजित पवार यांनी सांगितले.



**ग्रामसडक योजनेचा पहिला टप्पा पूर्ण :** अजित पवार म्हणाले, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील पहिल्या टप्प्यातील कामं पूर्ण झाली असून दुसऱ्या टप्प्यांतर्गत ९.६१० किमी लांबीच्या रस्त्यांचा दर्जा सुधारण्याची कामं हाती घेतली आहेत. ही कामं मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचं नियोजन आहे. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात अतिरिक्त ७ हजार किमी रस्त्यांचं काँक्रिटीकरण केलं जाईल. तिसऱ्या टप्प्यात १ हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असणारी ३,५८२ गावे १४ हजार किमी लांबीच्या सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याने प्रमुख जिल्हा-राज्य-राष्ट्रीय महामार्गांना जोडली जातील. याची एकूण किंमत ३०,१०० कोटी रुपये इतकी आहे. पहिल्या टप्प्यात ८ हजार कोटींची केली जाणार आहेत.


### मान्यवरांच्या प्रतिक्रिया



या अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्यासाठी आमचे काम सुरू आहे .एक लक्षात घ्या अर्थसंकल्पाचा समतोल राखणेही महत्त्वाचे आहे . घोषणा दिली आहे, तर ती पूर्ण करायची आहे . सध्या ट्रेंड्स खूप चांगले चालले आहेत . योजना दीर्घकाळ चालवायची असेल तर आपल्याला त्यासाठी आर्थिक तरतुदीही करणे महत्वाचे असते . समतोल राखत पुढे जायचे आहे, त्यामुळे आम्ही अर्थसंकल्पात जी आश्वासने दिली आहेत ती पूर्ण करणार . एप्रिल महिन्यात १५०० रुपयेच मिळणार . आम्ही २१०० रुपये कधी मिळणार ते घोषित करु . जेव्हा घोषित करु त्याच्या पुढच्या महिन्यांपासून २१०० रुपये महिलांना मिळण्यास सुरुवात होईल . योजनेचे पैसे वाढवण्याची गरज पडली तर जुलै आहे, डिसेंबर महिना आहे . आवश्यक तेवढी तरतूद आपण यामध्ये ठेवली आहे . **-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**



लाडकी बहीण योजनेचे पैसे वाढवण्यासह इतर अनेक मुद्द्याबात त्यांनी प्रश्न उपस्थित केले . यावेळी ते म्हणाले की, "आज आचार्य अत्रे असते तर म्हणाले असते, गेल्या १० हजार वर्षात इतका बोगस अर्थसंकल्प झाला नसेल . निवडणूक काळात वारेमाप जाहीराती केल्या होत्या . थापा मारायचे थांबणार नाही असे घोषवाक्य हवे . मारल्या होत्या थापा भारी, महाराष्ट्र केला कर्जबाजारी, असे उद्धव ठाकरे म्हणाले . निवडणुकीच्या काळात महायुतीकडून वारेमाप जाहिराती करण्यात आल्या . जाहिरातीत अनेक गोष्टी सांगितल्या आणि सरकार निवडून आणले, मते मिळवली . त्यातील ईव्हीएम घोटाळा हा भाग वेगळा आहे . पण प्रचंड बहुमताच्या या सरकारने थापांमधून एकतरी आश्वासन पूर्ण केले का ? लाडक्या बहिणींना २१०० रुपये दिले का ?", असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला . **-माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे**



हा अर्थसंकल्प फक्त शहरांसाठी बनवलेला आहे का ? अर्थमंत्र्यांच्या भाषणात मेट्रो उड्डाणपूल भुयारी मार्ग, विमानतळं, कनेक्टिव्हिटी पायाभूत सुविधा यांचाच बोलबाला आहे . पण राज्यातल्या सर्वसामान्य जनतेला भेडसावणा-या महागाई, बेरोजगारी या मूलभूत समस्या सोडवण्याबाबत सरकारकडे काही ठोस धोरण किंवा उपाययोजना नाही . आजच्या अर्थसंकल्पात शेतकरी कर्जमाफी बद्दल एक शब्द ही नाही . शेतक-यांना मोफत वीज देण्याची घोषणा सुद्धा पोकळ असून आजही शेतकऱ्यांना वसुलीसाठी वीज बिले पाठवली जात आहेत . शेतकरी सन्मान निधीत वाढ करण्याचे आश्वासन दिले पण अंमलबजावणी नाही . शेतकऱ्यांच्या मेहनतीमुळे कृषीक्षेत्रामुळे विकास दर वाढला पण सरकारने शेतकऱ्यांच्या मालाला भाव दिला नाही त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे . **-हर्षवर्धन सपकाळ, अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी**



आम्हाला अपेक्षा होती की, शेतकऱ्यांची कर्जमाफी सरकार जाहीर करेल, तेही झाले नाही . शेतकऱ्यांना प्रधानमंत्री सन्मान योजनेचे ३ हजार रुपये वाढवण्याची जी घोषणा आहे तीही कुठे आढळली नाही . विजेचे दर कमी करण्यासाठी काही ठोस उपाययोजना दिसत नाही . राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये असमतोल तयार झालेला आहे . फक्त आश्वासनांचा हा अर्थसंकल्प आहे .शिवभोजन योजनेचा कुठेही उल्लेख नाही . त्यामुळे ती बंद करण्याचा सरकारचा दृष्टिकोन दिसतोय अशी आमची शंका आहे . आनंदाचा शिधा यावर देखील भर देण्यात आलेला नाही .महागाई कमी करण्यासाठी सरकारने कोणतीच कार्यवाही केलेली नाही . **-जयंत पाटील, प्रदेश अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शरद पवार गट**

### ठळक वैशिष्ट्ये

- राजकोषीय उत्तरदायित्व व वित्तीय व्यवस्थापन कायद्यानुसार राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यातही शासन यशस्वी ठरले आहे . तसेच राज्याची महसुली तूट ही सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या १ टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे . सन 2025-26 ची राजकोषीय तूट 1 लाख 36 हजार 235 कोटी रुपये आहे .
- आर्थिक सुधारणांच्या माध्यमातुन, भांडवली खर्चातील वाढीद्वारे विकासचक्रास चालना देऊन राज्याच्या विकास दरात वाढ करण्याचे उद्दीष्ट साध्य करण्याचे प्रयत्न आहेत . मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था १४० बिलीयन डॉलर वरुन सन २०३० पर्यंत ३०० बिलीयन डॉलर तर सन २०४७ पर्यंत १ .५ ट्रिलीयन डॉलर पर्यंत नेण्याचे उद्दीष्ट आहे . मुंबई महानगर प्रदेशात हाती घेण्यात आलेल्या विविध पायाभूत सुविधांची कामे जसे की वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, बुलेट ट्रेन, मल्टीमोडल कॉरीडॉर, भुयारी मार्ग, मेट्रो प्रकल्प यामुळे हे क्षेत्र विकासाचे केंद्र ठरणार आहे .
- विकसित भारत- विकसित महाराष्ट्र ही संकल्पना साध्य करण्याकरीता "मेक इन महाराष्ट्र" व्दारे गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्राचे नवीन औद्योगीक धोरण आखण्यात येणाार आहे . पुढील पाच वर्षाच्या कालावधीत ४० लाख कोटी रुपायांची गुंतवणुक व ५० लाख रोजगार निर्मिती अपेक्षीत आहे .
- कृषी क्षेत्राच्या गेल्या वर्षीच्या निराशाजनक 3 .3% विकास दराच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना विविध योजना, कार्यक्रमांच्या माध्यमातुन आर्थिक सहाय्य दिल्यामुळे सन 2024-25 मध्ये कृषी क्षेत्राचा विकास दर 8 .7% पर्यंत सुधारला . या विकास दरात सातत्याने वाढ करण्याकरीता शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेती उत्पादनात मूल्यवर्धन, सिचंन सुविधा, वीजेची गरज भागविण्यासाठी सौर ऊर्जा इत्यादी पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येतील .
- केंद्र पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून राज्यास अधिकाअधिक केंद्रीय निधी प्राप्त व्हावा म्हणून विशेष प्रयत्न करण्यात येतील .
- वस्तु व सेवा करातुन राज्यास होणाऱ्या उत्पन्नात दरवर्षी सुमारे १२ ते १४ टक्के एवढी वाढ होत आहे .
- महत्वाकांक्षी योजनांना निधीचा सुरळीत पुरवठा होण्याकरीता केंद्रीय सहाय्य, आतंरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून सहाय्य , सार्वजनिक मालमत्तेचे मुद्रीकरण, योजनांचे सुसूत्रीकरण तसेच पायाभूत सुविधा गुंतवणूक न्यास सारखे नाविण्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत .
- राज्यातील महामार्ग, बंदरे, विमानतळे, जलमार्ग, बस वाहतूक, रेल्वे आणि मेट्रो या सर्व दळणवळण क्षेत्रांसाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली आहे .
- दर्जेदार ग्रामीण रस्ते तसेच राज्य महामार्ग व जिल्हा रस्त्यांना सर्वाधिक आर्थिक पाठबळ देण्यात येत आहे .
- सर्वांसाठी घरे हे उद्दीष्ट येत्या ५ वर्षात साध्य करण्यासाठी राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे . ग्रामीण घरकुलांसाठी 15 हजार कोटी तर शहरी आवास योजनांसाठी ८ हजार १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे .
- नव्याने जाहीर केलेल्या योजनांसाठी पुरेशा तरतुदी केलेल्या आहेत . राज्याच्या वार्षिक योजनेत ६२ हजार ५६० कोटीची म्हणजेच सुमारे ३३ टक्के इतकी भरीव वाढ करण्यात आली असून अनुसूचीत जाती घटक योजनेच्या तरतुदीत ४२ टक्के, आदिवासी घटक योजनेच्या तरतुदीत ४० टक्के वाढ करण्यात आली आहे .
- राज्यात सध्या राबविण्यात येत असलेल्या योजनांचे मुल्यमापन करुन त्यांचे सुसूत्रीकरण तसेच साधनसंपत्तीच्या स्त्रोतांचा अभ्यास करुन त्यामध्ये वाढ करण्याचे उपाय सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे . या समितीच्या शिफारशी विचारात घेऊन योजनांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहेत .
- थेट लाभार्थी हस्तांतरण ( डीबीटी ) सर्व वैयक्तिक लाभार्थी योजनांची अंमलबजावणी गतिमान, कार्यक्षम आणि पारदर्शक करण्यासाठी डीबीटी पध्दत राबविण्यात येत आहे . दिनांक १ एप्रिल २०२५ पासून अशा वैयक्तिक लाभार्थी योजनांचा लाभ केवळ डीबीटी द्वारे देण्यात येईल .
- राज्याच्या सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून पाठबळ देण्यात येत आहे अर्थसंकल्पात विविध स्मारके, तीर्थक्षेत्र विकास, पर्यटनस्थळ विकसित करण्याच्या विविध प्रकल्पांना भरीव तरतुद करण्यात आली आहे .
- राज्यातील जलपर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत .

16 . क्रीडा क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी आणि खेळाडूंना पाठिंबा देण्यासाठी धोरणे आणि अर्थसंकल्पीय तरतुदी करण्यात आल्या आहेत .

- राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना तसेच सार्वजनिक वितरण प्रणालीत स्मार्ट पीडीएस आणि ब्लॉक चेन तंत्रज्ञानाद्वारे अधिक पारदर्शकता आणण्यात येणार आहे .
- आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या पार्श्वभूमीवर सहकार क्षेत्रातील महाराष्ट्राचे नेतृत्व अधोरेखित करण्यासाठी विविध महोत्सव व कार्यक्रम आयोजित करण्यात येतील .
- राज्याचे सार्वजनिक आरोग्य धोरण आखण्यात येवून प्रत्येक व्यक्तीला 5 किलोमीटरच्या परिघात दर्जेदार प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत .
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची राज्यात प्रभावी अमंलबजावणी करण्यात येणार असून मुलींचा व्यावसायीक शिक्षणात सहभाग वाढविण्या करीता शिक्षण व परिक्षा शुल्काची 100 टक्के प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे .
- कायदेशीर खटले जलदगतीने निकाली काढण्यासाठी राज्यातील न्यायालयांच्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे .






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

माणूस काय सुरेख व्यक्तिचित्रे काढू शकला असता !" " पूर्वी डोळे कागदाजवळ नेऊन का होईना पण दिसत होते. आता संपूर्ण अंधत्व. पण या अंधारात त्यांच्या प्रज्ञाचक्षुंपुढे आजही रंगरेषांचे विलास चालू असतात. आता त्यांनी शिल्पकलेशी मैत्री जमवली आहे. स्पर्शातून आकाराचा अंदाज घेत छोटी छोटी मृत्तिका शिल्पे घडवीत असत. दिवस आणि रात्र यांच्यात आता अभेद आहे. आता रात्र झाल्यावर झोपलेच पाहिजे ही सक्ती नाही आणि दिवसा काम केलेच पाहिजे ही देखील सक्ती नाही. आता मानू ती वेळ ! पुढे एके दिवशी पुलंना कलाभवनाच्या वाटेवर विद्यार्थ्यांचा एक घोळका आढळला. ती मुले रंगसाहित्य घेऊन धावपळ करीत होती. पुलंनी थांबून पाहिले तर एका भिंतीपाशी विनोद दा उभे. भिंत हाताने चाचपीत म्हणायचे, ' इथे. ' बंगालीत विद्यार्थ्यांना छात्रच म्हणतात. मग एखादा छात्र किंवा छात्री तिथे वर्तमानपत्राचा एक कपटा चिकटवीत असे. पुन्हा विनोद दा भिंत चाचपीत म्हणायचे, ' इथे '. मग तिथे एक कपटा. असे काही कपटे चिकटवल्यावर विनोद दांनी हाताने त्या जागांना स्पर्श केला. एका शिष्याकडून खडू मागून घेतला आणि भिंतीवरच्या त्या कपट्यांना स्पर्श करीत सरसर सरसर रेखाकृती काढायला सुरुवात केली.



## पुलंचे एक अप्रतिम व्यक्तीचित्र - विनोद दा

## यशापयशाचे अचूक व्यवस्थापन

आधुनिक केसरी

जीवन म्हणजे यश अपयशाचा खेळ हा अचूकपणे खेळता आला तर जीवन प्रभावित होत नाही. जीवनात प्रत्येक वेळी यश मिळेल असं शक्य नाही आणि अपयश वाट्याला आलं म्हणून खचून जायचं नसतं नित्य प्रयत्न केला पाहिजे. आपयश आलं तर खचायच नाही आणि यश मिळाले तर हुरळून जायचं नाही. आशा, आकांक्षा, महत्वकांक्षा याचा सफल परिपक म्हणजे त्या त्या व्यक्तिच्या दृष्टीने अपेक्षित आहे ते मिळवणं म्हणजे थोडक्यात यश.ते मिळवणं जितकं अवघड आणि कठीण आहे त्यापेक्षाही ते कायम टिकवून ठेवणं महाकठीण असत हेच महाकठीण कार्य सुलभ व्हाव म्हणून यश मेंदूत शिरकाव करणार नाही एवढी दक्षता घेणं गरजेच आहे.यश बाजारात मिळत नाही अथवा इच्छा झाली म्हणून खरेदी करता येत नाही.जीवनातील कोणतही यश सहजासहजी मिळत नसतं त्यासाठी प्रदीर्घ प्रयत्न पराकोटीचा संघर्ष करावा लागतो.यश मिळवणं जितकं कठिण आहे त्या पेक्षाही ते कायम टिकवण खूप कठिण असत.




गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

यश कायम टिकविण्यासाठी यशाची किंमत आणि मूल्य समजलं पाहिजे.यश मेंदूत शिरणार नाही हिच काळजी दक्षता देखील घेतली गेली पाहिजे.यशाचा मेंदूतील शिरकाव अहंकाराला खतपाणी घालून वृद्धिंगत करतो आणि परिणाम स्वरूप यशाचं पतन कधी होत हेच कळतं नाही.त्याच प्रमाणे अपयश हे जर हदयात शिरलं तर मग त्याचे आपल्या मानसिकतेवर दुरगामी परिणाम होऊन मानसिकता बिघडते.यश आणि अपयश हे दोन्ही बाबी पचवता आल्या पाहिजेत. जीवनातील बर्या पैकी समस्यांच मुळ हि आपणच आहोत. करण यश अपयश हे जीवनातील ऋतुचक्र मलिका आहेत याचा प्रत्यय वेळेनुसार आपल्याला येणारच या मध्ये शंका नाही.यश अपयश या खेळातील अभिनयातील आपण अविभाज्य पात्र असल्याने या अभिनयाला अंखडीत पणे आपल्याला सामोरे जावाच लागेल.जीवनात जसं यश मिळतं तसं अपयश पण पदरी पडतच. यश मिळाले तर हुराळुन जाऊ नये ते डोक्यात मेंदूपर्यंत जाणारं नाही याची काळजी घेतली पाहिजे जर यश हे मेंदू पर्यंत पोहचल तर मग अंहकार निर्माण होणारच आहे. आणि त्याच यशाचं अंहकार अपयशात रूपांतर करू शकतो.महणुन यश मिळालं तरी सावधपणे जपलं पाहिजे टिकवून ठेवता आलं पाहिजे आणि अपयशाला सामोरे गेल्यावर अपयश हे ह्रदयात प्रवेश करून जीवनावर विपरीत परिणाम करेल असं होता कामा नये.जीवन हे यश अपयशाने भरलेला सागर आहे जितकं सुख तितकंच दुःख जेवढा आनंद तेवढंच दुःख जितकं यश तितकंच अपयश पण हे सगळं घडत असताना आपण स्थिर भाव जपला पाहिजे म्हणजे कोणत्याही क्षेत्रातील करिअरमध्ये मार्गक्रमण करत असताना त्या मध्ये संयम हा खुप महत्वाचं मुद्दा आहे आणि संयम सुद्धा पराकोटीचा असला पाहिजे जेणेकरून कोणत्याही क्षणाचा परिणाम आपल्या जीवनावर होणार नाही.यश मिळाल तर उणमत होऊ नये आणि अपयश आलं तर हताश होऊ नये.

## नाम हेच प्रपंच सुखी करण्याचे साधन ।

आधुनिक केसरी

संसारातील सार । आपला करावा रघुवीर ॥ कलि अत्यंत मातला। नीतिकर्तव्याचा विसर पडला ॥ अनाचार होतसे फार । आता नाही रामावाचून दुजा ठाव ॥ चोराने घरफोड केले । मग जागृतीचे कारण नाही उरले ॥ म्हणून असावी सावधान वृत्ति । अखंड राखावी भगवंताची स्मृति॥ भगवंतासी अनन्य होता । दुःखाची नाही तेथे वार्ता ॥ अभिमानवृत्ति सोडावी बरी । त्यास घडे रामसेवा खरी ॥ सरे मीपणाची उरी। ब्रह्मरूप दिसे चराचरी ॥



म्हणून ज्याने जन्माला घातले । ज्याने आजवर रक्षण केले ॥ तो माझा धनी हे ठेवून चित्ती । भावे भजावा रघुपति ॥ रामाचे व्हावे आपण । राम जोडावा आपण ॥ हेच जन्माचे । प्रपंचाचे, मुख्य कारण ॥ म्हणून रामाविण न मानी कोणी त्राता । धन्य त्याची माता पिता ॥ प्रपंच तसा परमात्म्यावाचून। हे जसे अलंकार सौभाग्यावाचून ॥ अलंकार सर्व घातले । पण सौभाग्यतिलक न लावले । तैसे रामाविण राहणे । आहे खरे ॥ ऐहिक आणि पारमार्थिक । न जाणावे एकाहून एक परते ॥ ऐहिक आणि पारमार्थिक सुख। रामावाचून नाही देख ॥ म्हणून शुद्ध असावे आचरण । तसेच असावे अंतःकरण । त्यात भगवंताचे स्मरण । हेच प्रपंच सुखी करण्याचे साधन ॥ रामचरणावर ठेवावा विश्वास । हेच परमार्थाचे भांडवल खास ॥ ऐहिक वागण्यात रामाचे स्मरण । हीच परमार्थाची खरी शिकवण ॥ माझे हित भगवंताचे हाती । हीच ठेवावी मनाची प्रवृत्ति॥ राम कर्ता ही असावी भावना । तो जे करील ते आपल्या हिताचे जाणा ॥ भाव ठेवावा रामापायी। पण व्यवहार चुकू न देई ॥ परमात्म्याचे राखणे अनुसंधान । हाच परमार्थाचा मुख्य मार्ग जाण ॥ बाह्यांगाने करावी प्रपंचाची संगति । चित्ती असावा एक रघुपति ॥ प्रयत्न करणे आपल्या हाती। यश देणे भगवंताचे हाती ॥ प्रयत्नाला न पाहावे पुढे मागे । परि परमात्मा उभा आहे मागे। ही ठेवावी जाणीव मनामध्ये ॥ प्रपंचात दक्षतेने वागत जावे । धीर सोडू नये । भगवंताचे आधारावर निभ्रांत असावे ॥ सर्व कामधंदा घरी करी । पण चित्त लेकरांवरी । ऐसे जैसे करी जननी जाण। तैसे वागावे आपण । काया गुंतवावी प्रपंचात । मन असावे रघुनाथात । नीतिधर्माचे आचरण । पवित्र असावे अंतःकरण । त्यात कर्तव्याची जोड पूर्ण । त्या सर्वात राखता आले अनुसंधान । तर याविण दुजा परमार्थ नाही जाण ॥ व्यवहार उत्तम प्रकारचा केला । पण परमात्मा विसरला । तो व्यवहार दुःखच देता झाला ॥ जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.



आधुनिक केसरी

## ऐसा पुण्यवान | मुनी होतो ||

**दानवांच्या संगे | पाप घरा येते ||**
**वाताहत होते | पुण्याईची ||१||**
**शिव्या शाप निंदा | वाचा विटाळते ||**
**नाम कैसे येते | मुखी त्याच्या ||२||**
**झिंगूनि चालता | बुद्धी भ्रष्ट होते ||**
**पायरी सोडते | माणूसकी ||३||**
**पशु होता नर | कोणा आवरावे ||**
**कुळाला नासवे | पापी पुत्र ||४||**
**भेटावा नारद | तोचि भाग्यवान ||**
**ऐसा पुण्यवान | मुनी होतो ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## छत्रपती राजारामराजे भोसले


आधुनिक केसरी


ह्या पदामुळे राजाराम महाराजांच्या अनुपस्थितीत प्रतिनिधी सर्व निर्णय घेऊ शकत होते. वरील सर्व परिस्थिती पाहता राजाराम महाराजांनी जिंजीला जाण्याचा निर्णय लगेच अंमलात आणला. स्वराज्याभोवती मोगलांचा वेढा घट्ट होत होता. राजाराम महाराजांनी गड सोडून किल्लेदारांना व मोठ्या सरदारांना भेट देण्यास आरंभ केला, त्यांना आपल्या बाजूस वळविण्यास बोलणी लावली. बरेच सरदार मोगलांस मिळाले होते, त्यांची चाचपणी केली. होताहोईतो मराठी लोकांना एकत्र आणण्याचे सुरू केले. पण यात एक मोठी मेख मोगलांनी मारून ठेवली होती. संभाजी महाराजांच्या शेवटच्या काही वर्षात औरंगजेब स्वतः दक्षिणेत असल्यामुळे मराठा सरदारांना मोगली सत्तेत समाविष्ट करण्यासाठी मोगलांनी वतने देणे सुरू केले होते. वतने देऊन मराठी लोकांना स्वराज्याचा बाबतीत निष्क्रिय करणे सुरू केले होते. वतनदारीची जी पद्धत शिवाजी महाराजांनी मोडली होती ती परत वर आली. याचा मराठी राज्याला फार तोटा झाला. त्यातच महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. लालूच, दुष्काळ आणि वतनाचा लोभ ही तीन कारणे एकत्र आल्यामुळे स्वराज्यातील बहुतेक देशमुख, पाटील, व सरदार मोगलांना मिळाले. छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्याचा बराचसा भाग अगदी काहीच दिवसात मोगली अंमलाखाली आला होता.[ संदर्भ हवा ] स्वराज्य राहून राहून सातारा-परळी, विशाळगड, रत्नागिरीचा काही भाग व मोजकेच दोन-पाच किल्ल्यापर्यंत मर्यादित झाले. राजाराम महाराज स्वतः ह्या वेळी पन्हाळ्यास होते. मोगलांनी पन्हाळ्यासदेखील वेढा घातला. राजाराम महाराजांवर संकटावर संकटे येत होती. रामचंद्रपंत, जे संभाजी महाराजांच्या काळात स्वराज्यात अमात्य होते त्यांना "हुकुमतपनाह" हा किताब दिला गेला व प्रतिनिधीस सर्वतोपरी सहकार्य करण्याचे ठरविले गेले. अंधाऱ्या रात्री राजाराम महाराज पन्हाळ्याच्या वेढ्यातून निसटले व जिंजीच्या मार्गावर लागले. भवानीने दुसऱ्यांदा पन्हाळ्यावर महाराष्ट्राला साथ दिली. राजाराम महाराज सुटल्याचे बहादुरखानाच्या लक्षात आले. तुंगभद्रा नदीतीरी भीषण संग्राम झाला. महाराज स्वतः लढत लढत नदीत उडी मारून निसटून गेले. बेदनूरला राणी चेन्नामा राज्य करत होती. तिने औरंगजेबाची पर्वा न करता महाराजांना आश्रय दिला व त्यांची सुखरूप रवानगी जिंजीला केली. जिंजीला छ. शिवाजी महाराजांचे जावई हरजीराजे महाडीक होते तेव्हा राजांनी जिंजी हस्तगत केली. जिंजीसारख्या ८००-९०० मैल दूर असलेल्या प्रदेशातून राजाराम महाराजांनी औरंगजेबाविरुद्ध दोन आघाड्या उघडल्या होत्या. जवळ पैसे नाही, सरदार नाही, सैन्य नाही अशा काळात सरदारांना परत बोलाविण्यासाठी त्यांनी वतनदारी देणे सुरू केले. वतनदारीच्या आमिषांमुळे परत जुने लोक स्वराज्याला सामील होऊ लागले. राज्यात दुष्काळ व मोगलांची जाळपोळ ह्यामुळे राज्यात गुन्हेगारी प्रचंड वाढली. यावर त्यांनी एक सरदार नेमला जो गावागावात फिरून गुन्हेगारांस शासन देई. राज्य कर्जबाजारी झाले. **क्रमश :**

आधुनिक केसरी

**संत तुकाराम महाराजांच्या एका अभंगाचे आध्यात्मिक स्पष्टीकरण, अभंगाचा अर्थ आणि त्यामागील आध्यात्मिक संदेश :** संत तुकाराम महाराजांनी या अभंगात एक अत्यंत मौल्यवान आध्यात्मिक तत्त्वज्ञान मांडले आहे. त्यांनी जीवनातील अंतिम सत्य उलगडून दाखवत, संपूर्ण जीवन भगवंताच्या चरणी अर्पण करावे, असे मार्गदर्शन केले आहे. "आहे तें सकळ कृष्णासी अर्पण। न कळतां मन दुजें भावी॥" या ओळींत तुकाराम महाराज आपल्या भक्तांना सांगतात की, जोपर्यंत आपले मन इतर सांसारिक गोष्टींकडे आकर्षित होते, तोपर्यंत खरी भक्ती साध्य होत नाही. भक्ती ही एकनिष्ठ आणि अखंड असावी. प्रत्येक वस्तू, आपले कर्तृत्व, आपले जीवन – सर्व काही श्रीकृष्णाच्या चरणी अर्पण करणे हेच अंतिम सत्य आहे. या ठिकाणी "कृष्ण" हा केवळ एक व्यक्ति म्हणून न समजता, तो परमात्म्याचे प्रतिक आहे. संपूर्ण विश्व त्याच्यामुळेच चालते, म्हणून आपण त्याच्यावर संपूर्ण श्रद्धा ठेवली पाहिजे. "म्हणऊनि पाठी लागतिल भूतें। येति गिवसीत पांचजणें॥" या ठिकाणी "भूतें" आणि "पांचजणे" या संकल्पनांचा आध्यात्मिक अर्थ सामावलेला आहे. येथे भूतें म्हणजे विकार आणि पांचजणे म्हणजे शरीरातील पाच मूलभूत तत्त्वे – पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाश होय. या पाच गोष्टींच्या अधीन राहिल्यास, मनुष्य वारंवार मोहग्रस्त होतो आणि परमात्म्याच्या मार्गापासून दूर जातो. तुकाराम महाराज स्पष्ट करतात की, जर आपण मोह-मायेच्या प्रेमात पडलो, तर हे विकार (काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर) आपल्या मागे लागू शकतात आणि आपल्या आत्मिक प्रगतीला अडथळा आणू शकतात. "ज्याचे त्या वंचलें आठव न होतां। दंड या निमित्ताकारणे हा॥" या ठिकाणी, संत तुकाराम महाराज सांगतात, की जो भगवंताला विसरतो, तो नेहमीच मोहग्रस्त होतो आणि आपल्या खऱ्या ध्येयापासून दूर जातो. भगवंताला विसरणे म्हणजे आपल्या जीवनातील सर्वात मोठे दुर्भाग्य होय. "निमित्ताकारणे हा" या वचनाचा अर्थ आहे की, भगवंतानेच हे जग निर्माण केले आहे आणि जो त्या निर्मात्याला विसरतो, तो संपूर्ण जीवनभर यातनाच भोगतो. भगवंताच्या आठवणीशिवाय जीवनाला काहीही मूल्य नाही. "तुका म्हणे काळें चेपियेला गळा। मी मी वेळोवेळा करीतसे॥" तुकाराम महाराज येथे अहंकाराचा मोठा धोका दर्शवतात. अहंकार हा प्रत्येकाच्या आत्मोन्नतीसाठी सर्वात मोठा अडथळा आहे. जो "मी" म्हणतो, जो आपल्या कर्माचा, संपत्तीचा, विद्वत्तेचा गर्व बाळगतो, त्याला जीवनात मोठ्या यातना सहन कराव्या लागतात.

"काळे चेपियेला गळा" याचा अर्थ आहे, की मृत्यू कधीही येऊ शकतो आणि जोपर्यंत अहंकार टिकून राहतो, तोपर्यंत भगवंताची प्राप्ती होणे अशक्य आहे. म्हणूनच "मी" हे भाव मनातून पूर्णपणे नष्ट करावे आणि भगवंताच्या इच्छेने सर्व काही घडते, ही भावना जोपासावी.






## तुका म्हणे...

**या अभंगातून मिळणारे जीवनसूत्र :**
१. सर्वस्व कृष्णार्पण कराः आपले जीवन, कर्म, विचार आणि कर्तृत्व हे पूर्णपणे परमेश्वराच्या चरणी अर्पण केले पाहिजे.
२. मोह आणि विकारांपासून दूर राहाः शरीरातील पाच विकार आणि भूतभावनेच्या आहारी जाऊ नका. ३. अहंकार नष्ट कराः "मी" ही भावना विसरली, तरच ईश्वरप्राप्ती शक्य आहे. ४. मरणाच्या भयातून मुक्त व्हाः जो भगवंताला अखंड स्मरण करतो, त्याला मृत्यूचे भय रहात नाही. **निष्कर्ष :** संत तुकाराम महाराजांनी या अभंगाद्वारे अत्यंत सुंदर रीतीने भगवंतावर अखंड श्रद्धा आणि समर्पण करण्याचे महत्त्व पटवून दिले आहे. जोपर्यंत आपण आपल्या जीवनाचे सार्थक परमेश्वराच्या चरणी अर्पण करत नाही, तोपर्यंत खरा आत्मिक आनंद मिळू शकत नाही. संत तुकाराम महाराजांचे हे अमृततुल्य शब्द आजच्या आधुनिक जीवनातही तितकेच लागू पडतात. सध्याच्या स्पर्धात्मक आणि धकाधकीच्या जीवनात, आपले मन प्रत्येक क्षणी अस्थिर होते. म्हणूनच हा अभंग सांगतो, की आपले मन भगवंताच्या चरणी अर्पण करा आणि त्याच्या इच्छेनुसार चालण्याचा संकल्प करा.
जो संपूर्ण भक्तिभावाने हे तत्व आचरणात आणतो, तोच खऱ्या अर्थाने संत तुकाराम महाराजांच्या शिकवणीचा वारसदार होतो.

विद्यावाचस्पती विद्यानंद ©

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, ११ मार्च २०२५
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०४ अंक - १९७
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६
●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 11 MARCH 2025 adhunikkesari.com ●YEAR-4 ●ISSUE-197 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# स्त्रीने स्वत:चे अस्तित्व टिकून समाजाला पुढे न्यावे : डॉ. अनिता नाईक

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** प्रत्येक स्त्रीने आपले अस्तित्व कायम टिकवुन समाजाला पुढे नेण्याचे कार्य करावे असे विचार भोकर येथील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ.अनिता राम नाईक यांनी दिनांक ८ मार्च रोजी शासकीय मुलीचे वस्तीगृह भोकर येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा भोकर च्या वतीने आयोजित जागतिक महिला दिनाच्या औचित्याने विविध क्षेत्रातील कर्तबगार महिलांचा सन्मान सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना व्यक्त केले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ए.पी.आय.कल्पना राठोड,बालरोग तज्ञ डॉ. प्रभा केंकरे, प्राचार्य अंबिका जाधव,सामाजिक कार्यकर्त्या नीता माळी, नगरपरिषद कर्मचारी प्राजक्ता हापसकर,पत्रकार ज्योती सरपाते, क्रिडा प्रशिक्षक पार्वती चव्हाण,राष्ट्रीय खेळाडु राणी जाधव आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित विविध क्षेत्रातील कर्तबगार महिलांचा पत्रकार संघातर्फे,शाल,साडी, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की प्रत्येक स्त्रीने आपल्या जीवनात उत्तम संस्कारांची जाणीव ठेवून पवित्र जीवन जगावे. कारण आपण या भारत भूमीच्या पावन धरतीत जन्म घेतला आहे याचं भान आपणाला असने गरजेचे आहे. प्रत्येकाने स्वतःच्या पायावर उभे राहून सन्मानाने जीवन जगायचे आहे. जीवनात ध्येय निश्चित ठरवून त्याला गवसणी घालण्याचे प्रयत्न सर्वांनी करावेत आणि स्वतःत असलेले सद्गुण ओळखून त्या गुणांची नेहमी प्रगती करत राहावी असे सांगितले. या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्त्या नीता माळी यांनी सांगितले की प्रत्येक स्त्रिकडे दैवी शक्ती आहे तेव्हा समोरचा माणूस कसा आहे हे ओळखण्याची ताकद आपणाला भगवंतांनी दिलेली आहे त्याचा अवलंब करा. एकमेकीचा आदर करा,कोणाचाही द्वेष करू नका. सर्वांना सोबत घेऊन नेटाने पुढे जा असे सांगितले. प्राचार्या अंबिका जाधव यांनी बोलताना सांगितले की येणाऱ्या प्रत्येक संकटाला आत्मविश्वासाने समोर जा विजय तुमचाच आहे तर डॉ.प्रभा केंकरे यांनी स्त्री ही दोन कुटुंबे घडवण्याचे पवित्र कार्य करीत असते त्यामुळे ती संस्कारित व शिक्षित होणे गरजेचे आहे असे सांगितले. ए.पी.आय. कल्पना राठोड यांनी सांगितले की महिला ही उपजतच खास आहे.तेव्हा आपलं जीवनही खासच असलं पाहिजे.चुकीची संगत व चुकीचे पाऊल पडू देऊ नका.आपला जन्म फक्त चूल आणि मूल एवढ्यासाठीच नाही तर आपण मनात आणलो तर आकाशालाही गवसणी घालू शकतो ही ताकद ईश्वराने आपणाला दिलेली आहे. तेव्हा या ईश्वर दत्त मिळालेल्या गुणांचा सर्वांनी सदुपयोग करून घ्यावा असे सांगितले.पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष बालाजी नार्लेवाड यांनी आपल्या मनोगतात स्त्री ही केवळ भोगदासी नसून ती भगवंतांने निर्माण केलेली एक उत्कृष्ट कलाकृती आहे.तेव्हा समाजाने तिच्याकडे सदैव पूजनीय दृष्टीनेच पाहिले पाहिजे." यंत्र नारेस्तु पूजते तत्र रमते देवता " ही आपली संस्कृती आहे.ज्या समाजात नारींचा मानसन्मान आहे त्याच समाजात उज्वल संतती जन्माला येत व तोच समाज सुसंस्कृत जीवन जगू शकतो असे सांगितले. सूत्रसंचालन पत्रकार संघाचे सल्लागार सुधांशू कांबळे सर यांनी केले तर आभार संघाचे सचिव कमलाकर बरकमकर यांनी मांनले.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष विजय चिंतावार, कार्याध्यक्ष सारंग मुंदडा,उपाध्यक्ष विठ्ठल सुरलेकर,कोषाध्यक्ष रमाकांत जोशी व सर्व पदाधिकाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.



# महिलांनी रोजच्या कामाच्या गराड्यातून आरोग्य जपावे : मा. सभापती नलवडे

आधुनिक केसरी न्यूज

**कुडूत्री :** इतिहास बदलण्याची ताकद महिलांमध्ये कशी असते हे इंदिरा गांधी यांनी आपल्या कर्तृत्वातून जगाला दाखवून दिले होते. कितीही प्रतिकूल स्थिती असली तरी त्यातून बाहेर पडून यशस्वी झाल्याचे अनेक महिलांनी यापूर्वी दाखवून दिले आहे. त्यामुळे महिलांनी स्वतःला कमी लेखू नये. आपल्यातील क्षमता ओळखा, रोजच्या रहाटगाडग्यात स्वतःकडे लक्ष द्या, योग्य आहार व्यायाम याच्या मदतीने स्वतःला जपा असे प्रतिपादन भुदरगड पंचायत समितीच्या माजी सभापती अक्काताई प्रवीण नलवडे यांनी केले त्या सोन्याची शिरोली (ता. राधानगरी) येथे झालेल्या महिला दिन कार्यक्रमात बोलत होत्या. अध्यक्षस्थानी सरपंच अश्विनी गुरुनाथ चौगले होत्या. येथील आदर्श महिला सहकारी दूध संस्थेने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. राधानगरी पंचायत समितीच्या आरोग्य विस्तार अधिकारी विजयमाला साताप्पा पाटील यांनी महिला लाजेखातर आपल्याला होणारा त्रास इतरांना सांगत नाहीत. कामाच्या व्यापात शरीर स्वच्छतेकडे दुर्लक्ष करतात त्यामुळे भविष्यात अनेक आजारांना सामोरे जावे लागते प्रसंगी जीवावरही बेतते. हे टाळण्यासाठी महिलांनी दक्ष राहण्याची आवश्यकता आहे असे सांगितले. सरपंच अश्विनी चौगले यांनी सावित्रीबाई फुले यांच्यामुळे महिलांना घराच्या बाहेर पडण्याची संधी मिळाली या संधीचा योग्य उपयोग करून स्वतःला सिद्ध करा असे सांगितले. यावेळी स्पर्धा परीक्षेतील विविध ठिकाणी निवड झालेल्या, वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षणासाठी निवड झालेल्या मुलींचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. विश्वकर्मा योजना व बचत गट चळवळीत महिलांना असलेल्या संधी बाबत राजेंद्र चव्हाण, आशा सेविका पूजा चौगुले यांनी मार्गदर्शन केले. राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. व्यासपीठावर ग्राम पंचायत सदस्य सुवर्णा पोवार, तहसील कार्यालय प्रतिनिधी रेखा मुळे, संस्थेच्या अध्यक्षा संगीता संजय पारकर, उपाध्यक्ष आनंदी चौगले उपस्थित होत्या. आर डी निउंगरे यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. संजय पारकर यांनी आभार मानले. यावेळी संस्थेच्या सर्व संचालिका उपस्थित होत्या पहिल्यांदाच अशा प्रकारचा कार्यक्रम झाल्याने महिलांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत मोठ्या संख्येने हजेरी लावली.

# इतिहासातूनच आपली ओळख : अभिजित जोग

आधुनिक केसरी न्यूज



**गडचिरोली :** पदव्युत्तर इतिहास विभाग व आदिवासी अध्यासन केंद्र गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने गोंडवाना विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीचे ५७ वे विदर्भ इतिहास परिषदेचे आयोजन ७ व ८ मार्च रोजी आयोजित करण्यात आले होते. देशाच्या भविष्याच्या दृष्टीने इतिहास हा विषय सर्वाधिक महत्वाचा विषय आहे, कारण देश म्हणजे भौगोलिक सीमांच्यामध्ये वसलेला प्रदेश आहे, त्या प्रदेशाच राष्ट्र तेव्हाच बनत जेव्हा त्या प्रदेशात राहणारे लोक संस्कृतीच्या धाग्यांनी एकमेकांशी जोडले जातात. आपल्या इतिहासातूनच आपल्याला आपली ओळख मिळते. इतिहासातून मिळणारी ती ओळखच जर आपल्याला नीट पटली नाही, तर मग कणा नसलेल्या शरीरासारखा आयुष्य नशिबात येत असत. भारत हा जगातील कदाचित असा एकमेव देश असेल की ज्याची ओळख त्याच्या पासून हिरावून घेण्यात आली आहे. भारताच्या इतिहासाच्या संदर्भात साम्राज्यवादी शक्तींना जे सोयीच होत ती ओळख त्यांनी भारतावर लादली आहे. त्यामुळेभारताच प्रचंड नुकसान झाल ते आपण बघत आलो आहोत. मध्ययुगीन काळात पाच्यात्य देश भारतीय भाषा व संस्कृतीने भारावून गेले होते, जेव्हा भारताच्या संदर्भात त्यांच्या राजकीय आशा आकांक्षा जागृत झाल्या त्यानंतर त्यांना भारताच्या परंपरा, संस्कृती व इतिहासाबद्दल जे प्रेम निर्माण झाल होत ते त्यांच्यासाठी गैर सोयीचे झाले. भारतात सत्ता स्थापन करून ती निरंतर टिकवून ठेवण्यासाठी भारतीय लोकांचा आत्मसन्मान आत्मविश्वास नष्ट करायचं त्यामुळे भारतीय ब्रिटीशांची सत्ता स्वीकारतील ते आपला विरोध करणार नाहीत. त्यासाठीभारताची शिक्षण व्यवस्था नष्ट करून ब्रिटीश शिक्षण व्यवस्था भारतावर लादली. सोबतच ब्रिटीशांनी भारताच्या इतिहासाचे विकृतीकरन केले आहे. भारताच्या संदर्भात ब्रिटिशांना हवा तसा इतिहास लिखाण केले आहे. भारतात जे काही चांगले दिसते ते सर्व भारतीयांना पास्च्यात्यांकडून मिळालेले आहे असे ब्रिटिशांनी सांगितले यासाठी त्यांनी इतिहासाचा वापर केला आहे. भारत राष्ट्र कधीच नव्हता जेव्हा भारतात ब्रिटीशांची सत्ता निर्माण झाली तेव्हा भारत एक राष्ट्र म्हणून उदयास आला आहे असे ब्रिटिशांनी जाणीव पूर्वक बिंबविले आहे. भारतच राष्ट्रीयत्व हे राजकीय नसून ते सांस्कृतीक आहे. भारत हा भाषा आणि संस्कृतीची गंगोत्री आहे. भारतात पहिला ज्ञानाधीष्टीत समाज उदयास आला होता. भारतात संख्या प्रणाली सर्व प्रथम निर्माण झाली. भारताची ही खरी ओळख भारतीय इतिहासकारानी लिहिण्याची गरज आहे असे ५७ व्या विदर्भ इतिहास परिषदेचे उद्घाटक अभिजित जोग यांनी प्रतिपादन केले. उदघाटन समारंभाला अध्यक्ष म्हणून प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, डॉ. अनिरुद्ध देशपांडे दिल्ली विद्यापीठ, डॉ. नारायण भोसले, मुंबई विद्यापीठ, डॉ. ग. का.माने अमरावती विद्यापीठ, डॉ. शाम कोरेटी नागपूर विद्यापीठ, विदर्भ इतिहास परिषदेचे अध्यक्ष डॉ. शरद डवरे, सचिव डॉ. रवी लोणारे, इतिहास विभाग प्रमुख डॉ. नंदकिशोर मने आदिवासी अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. वैभव मसराम, परिषदेचे स्थानिक सचिव डॉ. प्रफुल नांदे उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. हेमराज निखाडे तर आभार डॉ. नरेश मडावी यांनी मानले.

# डॉ. खत्री महाविद्यालयात जागतिक महिलादिन व बक्षिस वितरण सोहळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात जागतिक महिला दिन व बक्षिस वितरण सोहळा थाटात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मान. डॉ. एन.एच. खत्री सर होते, तर मार्गदर्शक म्हणुन सौ. संध्याताई विरमलवार यांना आंमत्रीत करण्यात आले होते. सोबतच प्रमुख अतिथी म्हणुन सर्वसेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. श्रीकांतजी चहारे सोबतच संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. श्री. दिपकजी गुटेवार, संस्थेचे सचिव डॉ. सुशिल कपुर. सहसचिव श्री. अभिलेश खत्री, कोषाध्यक्ष प्रा. अनुश्री पाराशर, सदस्या श्रीमती यु. बी. कपुर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली. प्रमुख मार्गदर्शिका सौ. संध्याताई विरमलवार महिला दिनाच्या निमित्ताने मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की, महिलांच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय कामगिरीचे स्मरण करण्याच्या उद्देशाने दरवर्षी ०८ मार्च हा दिन जागतिक महिला दिन म्हणुन साजरा केला जातो. त्यांनी विविध उदाहरणे देऊन मौलीक असं मार्गदर्शन केलं.




याचदिवशी महाविद्यालयात वर्षभरात विविध विभागाच्या वतीनं विविध उपक्रम राबविले जातात त्यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभाग घेतात. सहभागी विद्यार्थ्यांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना व विद्यापीठांच्या परिक्षांमध्ये प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच क्रिडामध्ये प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येतात. यावर्षी १५० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हसते गौरविण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. खत्री सर अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, एका कृतीच्या वृक्षाला बहरत असलेला आशादायक प्रसंग दिसतो आहे याचा मला विशेष आनंद आहे. त्यांनी मौलीक असं मार्गदर्शन केलं आणि जागतिक महिलादिनाच्या शुभेच्छा दिल्या. संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. श्री. दिपकजी गुंटेवार यांनीही मौलीक असं मार्गदर्शन केलं. महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. एस.बी. मोहीतकर. श्री. संजयजी पाराशर. सौ. महिमा खत्री, सौ. लता कपुर यांचीही प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे यांनी केले. जागतिक महिला दिन सोहळ्याचे संचालन डॉ. ज्योत्स्ना मोहितकर यांनी केले. थाटात संपन्न झालेल्या बक्षिस वितरण सोहळ्याचे संचालन प्रा. संतोष कावरे यांनी केले तर मान्यवरांचे आभार प्रा. करूणा खोब्रागडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

# ललित मोदींना झटका !

आधुनिक केसरी

इंडियन प्रीमियर लीग अर्थात 'आयपीएल'चे माजी अध्यक्ष ललित मोदी हे आता पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. त्याचे कारण म्हणजे ललित मोदी यांनी त्यांचा भारतीय पासपोर्ट परत करण्यासाठी अर्ज केला असल्याची माहिती समोर आली होती. तसेच ललित मोदींनी आता वानुआटू  या देशाचे नागरिकत्व स्वीकारल्याचे देखील सांगण्यात आले होते. मात्र आता त्यांना मोठा धक्का बसला आहे. वानुआटूचे पंतप्रधान जॉथम नापत यांनी सोमवारी सिटीझनशीप कमिशनला ललिल मोदी यांचा पासपोर्ट रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. दक्षिण पॅसिफिक बेट राष्ट्र वानुआटूचे नागरिकत्व प्रत्यार्पणापासून बचाव करण्यासाठी घेतल्याचा आरोप नापत यांनी केला आहे. आयपीएलच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याच्या प्रकरणात ललित मोदी भारतीय तपास यंत्रणांना हवा आहे, याबद्दल आंतरराष्ट्रीय माध्यमांच्या वृत्तांमधून माहिती समोर आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. "मी सिटीझनशीप कमिशनला ललित मोदीचा वानुआटु पासपोर्ट रद्द करण्याची कार्यवाही ताबडतोब सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत, अशी माहिती पंतप्रधान नापट यांनी एका अधिकृत निवेदनात दिली आहे. मला गेल्या २४ तासांपूर्वी कळविण्यात आले की कोणतेही ठोस न्यायालयीन पुरावे उपलब्ध नसल्यामुळे इंटरपोलने भारतीय अधिकाऱ्यांनी ललित मोदी विरोधात अलर्ट नोटीस जारी करण्याची विनंती दोनदा नाकारली. अशा अलर्टमुळे मोदींचा नागरिकत्वासाठीचा अर्ज आपोआपच नाकारला गेला असता, असे वानुआटूच्या पंतप्रधानांतर्फे जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# चंगळवादाच्या भोगामुळे गौरव आहुजाचे अश्लिल चाळे



राम कुलकर्णी
संपर्क क्र. 94227 42577

आधुनिक केसरी

**सरस्वतीचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात परवा गौरव आहुजा आणि भग्वेश ओस्वाल दोन तरूणांनी हमरस्त्यावर अश्लिल चाळे करत लघुशंका केल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर समाजात तीव्र संताप व्यक्त होताना दिसतो. सोशल मिडियाच्या माध्यमातुन त्या धेंडाचे कृत्य जगासमोर आल्यानंतर अनेक प्रश्न समोर उभा राहिले. चंगळवादाच्या भोगात लेकरं जेव्हा आडकू लागतात त्यावेळी बाप नावाचा माणुस स्वतःच्या डोळ्यावर पट्टी बांधतो.**

वेळीच कौटुंबिक संस्कृतीला आळा घालत नाहीत. कदाचित त्यांना वेळ भेटतही नसेल. मात्र काळ जात राहिला आणि पैशाच्या मस्तीत पोरं मोठे होऊ लागले तर अशा तरूणाईला चंगळवादाशिवाय काहीच दिसत नाही. लाज नावाची गोष्टही वेशीला टांगुन दारूच्या नशेत बापाची इज्जत भर चौकात गौरव सारखे धेंडं घालवुन टाकतात. अशा मित्राला भग्वेश ओस्वालसारखा हातात बिअरची बाटली घेवुन दात विचकत साथ देतो. त्यावेळी पहाणारेच खाली मान घालुन पुढे चालतात. गौरवच्या बापाने हे मान्य केलं की माझ्या मुलाने तोंडावर लघुशंका केल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. कदाचित अशा बिनबुडाच्या लेकराला जन्म दिल्याचा पश्चाताप बापाला होत असेल यापेक्षा दुर्दैव कोणतं नाही.

संत तुकाराम महाराजांनी लिहुन ठेवलेले आहे की, कुळीकन्या पुत्र होते जे सात्विक, तयाचा हरिख वाटे देवा वारकरी संप्रदायात या पंक्तीचा अर्थ वेगळा असला तरी आमच्यासाठी तो अर्थ असा आहे की, ज्या कुटुंबामध्ये आई-वडिलांची पुण्याई तिथे कुळ चांगलं असतं आणि मग त्यांच्या पुण्याईने संतती अर्थात मुलं देखील चांगले निघतात. अशा कुळाचा हेवा परमेश्वराला वाटतो. अर्थात पुढे चालुन संत तुकाराम असंही म्हणतात, की मग आईच्या पुण्याईने शीलवान, धनवान तर बापाच्या पुण्याईने कर्तृत्ववान हा संदर्भ वर्तमान स्थितीत ज्या गोष्टी कानावर येवु लागल्या आणि डोळ्याने पहावेसा वाटेना त्यावेळी अभंगाची आठवण होते. काल परवा पुण्यात दोन तरूण ज्या नावाचा उल्लेख सुरूवातीला केला. रात्रभर दारू ढोसुन सुर्योदयाच्या सुमारास पुण्यातल्या शास्त्री नगर भागात भरचौकात गाडी उभा करतात काय? ज्यांना गाडी पार्किंगचे भान देखील नाही. त्या गाडीचा दरवाजा उघडाच ठेवतात काय? एवढेच नव्हे तर त्याच चौकात गौरवसारखा धेंडा अगदी मोकाट अश्लिल चाळे करतो आणि हमरस्त्यावर लघुशंकेला उभा रहातो. तो काही आडुशाचा भागही नव्हता. येणारे-जाणारे पहात होते आणि दुसऱ्या बाजुला त्याचाच मित्र भग्वेश जो की गाडीत डाव्या सिटवर बसुन हातात बिअरची बाटली आणि दात विचकतो. कदाचित गौरवच्या मोकार वागण्याला उत्सफुर्त पाठिंबा देतो असं म्हणायला हरकत नाही. या साऱ्या गोष्टी समाजातल्या चांगल्या व्यक्तीला जेव्हा पहावत नाही त्यावेळी कुणीतरी या मोकारांचा व्हिडिओ काढून व्हायरल करतो. मग प्रसारमाध्यम आणि सोशल मिडियावर विषय गाजतो. कधी कधी सोशल मिडिया तथा इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमाचे आभार मानावे तेवढे कमीच कारण समाजात ज्याप्रकारे घडामोडी घडतात त्यावर लगेच अंकुश ठेवण्याचे काम मिडिया करताना दिसते. मग गुन्हेगारी स्वरूपाचे, गुंडगिरीचे किंवा अशा माजलेल्या लेकराचे चाळे तथा कुटाणे हे सारे जगासमोर प्रसारमाध्यमाच्यामुळे येवु लागलं आणि मग सरकार व्यवस्था देखील चोखपणे त्याचा बंदोबस्त करताना दिसायला लागली. सांगायचं तात्पर्य हे आहे की, गौरव





आणि भग्वेशसारखी चंगळवादाच्या मस्तीत वागणारी पिढी सद्यस्थितीत जगाच्या पाठीवर गल्ली ते दिल्ली दिसायला मिळते. दोन गोष्टीचे चिंतन केल्यानंतर लक्षात येतं ते म्हणजे समाजात गरिबी आणि श्रीमंती दोन वर्ग ज्यामध्ये गरिबाची मुलं गुन्हेगारीकडे वळताना जास्त दिसतात.

कारण आर्थिक परिस्थिती त्यातुन होणारी कुचंबणा तर दुसरीकडे श्रीमंताच्या धेंडांना बापजाद्याकडून मिळणारा वारेमाप पैसा. या साऱ्या भानगडीत सामाजिक स्थिती अस्थिर बनत जाताना दिसते. श्रीमंतांचा वर्ग नाही म्हटलं तरी आता 25 टक्यापेक्षा जास्त त्यातही ज्यांना उद्योगपती तो वर्गही मोठ्या प्रमाणावर अलीकडे वाढलेला दिसतो. चंगळवादाच्या युगात भोगवाद जर स्विकारला तर मग त्या समुद्रात पिढी वाया गेल्याशिवाय रहात नाही. कुटुंबामध्ये बाप नावाच्या व्यक्तीने आयुष्यात केलेला संघर्ष, एक-एक पैशासाठी हाडाची केलेली काडं, स्वतःच्या लेकरांबाळासाठी संसार प्रवासात घेतलेले कष्ट या साऱ्या गोष्टी पोटच्या लेकराला अवगत करायला हव्यात. मात्र तसं न होता बापाने कमवलेला पैसा चंगळवादाच्या मार्गाने मुलं जेव्हा वापरतात त्यावेळी कुठल्याही गोष्टीची फिकिर त्यांना रहात नाही. कारण चंगळवादात मानसिकता देखील उधळणाऱ्या घोड्यासारखी होवुन बसते. अशा वेळी पैशाची किंमत कागदासारखीच त्या धेंडांना वाटते. या साऱ्या मानसिकतेमधुनच रात्रीची खेळ चाले मग पाटर्या, दारू, मस्तीत मस्ती, वेगवेगळे व्यसने, चरस, सिगारेट हे सारे प्रकार जन्मदात्या बापासमोर मुलं अंगीकृत करताना दिसतात. गौरव तथा भग्वेश यांची चंगळवादाची मस्ती त्याला जबाबदार बापचं म्हणावा लागेल. कारण आयत्या बिळावर नागोबा तयार झाले आणि समाजात उघड माथ्याने नाचु लागले. या धेंडाला ना पैशाची किंमत ना बापाची. ज्या मुलाला आपल्या चुकीमुळे किमान बापाची मान खाली जाईल याची पर्वा वाटत नसेल तर अशी धेंडं जन्माला येवुन तरी उपयोग काय? पुण्यासारख्या उच्चभ्रू संस्कृतीत जन्माला आलेली ही लेकरं ज्यांचे बाप उद्योजक म्हणुन ओळखले जातात. अशा धेंडांची मस्ती जगाच्या समोर नंगानाच करते तेव्हा समाजात अनेक प्रश्न उभा रहातात. कदाचित लहानपणापासूनच बापाने आपल्या लेकराला चंगळवादाची सवय लावली नसती तर ही लेकरं भोगवादात बुडाली नसती. अनेक प्रश्न या दोघांच्या जीवनात आता उभे राहु शकतात. त्यांचं भविष्य? वैवाहिक जीवन? कोण इथे पाहुणे होवुन येणार आणि आपली मुलगी या कुटुंबियात देणार? असे अनेक कौटुंबिक प्रश्न त्या परिवाराच्या समोर निश्चित आले.

गौरवच्या बापाचं खरं तर कौतुक करायला हवं कारण ज्या बापाने मुलाची मस्ती समोर आल्यानंतर माझ्याच तोंडावर मुलाने लघुशंका केल्याचं मान्य केलं. ही छाती कर्तृत्ववान बापाची म्हणावी लागेल. ज्या आई-वडिलांनी धेंडाच्या चुकीला पाठिशी न घालता थेट पोलीसांनी कठोर कारवाई करण्याची भुमिका घेतली. आदर्श माय-बाप म्हणुन खऱ्या अर्थाने कौतुकास पात्र ठरतात. आधुनिक जमान्यात पैशाला किंमत राहिलीच नाही म्हणुन अशी मस्ती मोकार पोरांची चव्हाट्यावर येते. या व्यवस्थेला जन्माला घालणारा बाप जबाबदार आहे असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही. लहान वयात मागेल तेवढा पैसा पुरवणं आणि आपल्याच मुलावर नियंत्रण न ठेवणं आणि जेव्हा मुलगा हाताबाहेर जातो त्यावेळी एखाद्या तलावाचा बांध फुटल्यासारखी परिस्थिती निर्माण होते. इथे बापाची मान शरमेने खाली जाते.

दुसरीकडे समाजात असेही लेकरं जे आपल्या आई-वडिलांच्या पुढे एक पाऊल टाकत नाहीत. मान, मर्यादा, स्वतःच्या जीवनाविषयी असलेल्या त्यांच्या कल्पना, उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवुन यशस्वी झालेले दिसतात. कौटुंबिक संस्काराचा अभाव कुठेतरी कमी पडतो हे मात्र नक्की. उद्योगपतीचे लेकरं जरी असले तरी त्या लेकरांना चंगळवादापासून दुर ठेवलं तर भोगवादाचं वेड कधी लागणार नाही. पण त्यासाठी बापाने देखील  मागे वळुन पहायला हवं हे नक्की. अलीकडे बाप आणि लेकरं एकाच बाटलीत दोघांचे चेहरे जेव्हा दिसतात असं चित्र पहायला मिळतं. त्यावेळी गौरव आणि भग्वेशसारखी लेकरं चंगळवादाने भारावुन जातात आणि हमरस्त्यावर लघुशंका करतात. अश्लिल चाळे करायला देखील मागेपुढे भित नाहीत. त्यामुळे पुण्यात घडलेला प्रकार प्रत्येक बापाने डोकावुन पाहिल्यानंतर समाजातल्या अनेकांना आत्मपरीक्षण करायलाच हवं हे नक्की.

# एस. टी. सेवा, ग्रामीण प्रवाशांची जीवनवाहिनी

आधुनिक केसरी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची वाहतूक सेवेला ७७ वर्षे झाली. एवढ्या वर्षात अनेक राजकीय पक्षांची सरकारे आली आणि गेली. आमदार, खासदार यांनी एस टी.बस मध्ये कायम आपली दोन आसने आरक्षण करून घेतली. स्वातंत्र्यांनंतरच्या लोकप्रतिनिधींना खरतर आरक्षणाची गरज नाही. एस.टी.महामंडळ अध्यक्ष,उपाध्यक्ष आणि परिवहन मंत्री, महाराष्ट्र राज्य. विविध आगारांचे व्यवस्थापक यांनी एवढ्या वर्षात प्रवाशांना चांगल्या सेवा सुविधा दिल्या असत्या तर आज प्रवाशांच्या नशिबी दुरावस्था आली नसती.ग्रामीण भागातील ७० टक्के प्रवासी एस.टी.सेवेवर अवलंबून आहेत. मोडकळीस आलेल्या बस प्रवाशांच्या दिमतीला आहेत. कोकणातील कोणताही एस.टी. डेपो निवडा, परिवहन मंत्र्यांनी आपल्या अधिकाऱ्यांसह भेट द्यावी. नादुरुस्त गाड्या रस्त्यावर धावताना दिसतील. टायर पंक्चर, मोडलेली आसने, अपुरी यंत्रसामुग्री अशा अनेक कारणांनी दररोज वेगवेगळ्या मार्गावरील धावणार्या बस रद्द करण्याची वेळ आगार व्यवस्थापकावर येते.ज्या गावात दिवसातून एकच गाडी धावते तेथील ग्रामस्थांचे हाल पाहवत नाहीत. एस.टी.ची स्थानके म्हणजे रोगराई पसरवणारी आगारे आहेत. येथील मूतार्या, शौचालये, उपहारगृहे कायम अस्वच्छ, दुर्गंधीने माखलेली असतात. सरकारकडून ७५ वर्षावरील प्रवाशांना मोफत प्रवास, महिलांना ५० टक्के सवलतीत प्रवास, ६५ वर्षावरील प्रवाशांना सवलत हे सर्व उपक्रमाबद्दल तिजोरीतून पैसा खर्च होतो. स्वारगेट स्थानकातील महिलेवरील अत्याचारानंतर महिलांची सुरक्षा हा मुद्दाच चर्चेचा विषय ठरला.सरकार आपली एस टी बस सुंदर आणि सुरक्षित कधी करणार असा प्रश्न प्रवाशांना पडला आहे.शतक महोत्सव जवळ येत असताना तरी सुधारणा व्हावी.एस.टी.वाहन चालकांचा सरकारने विशेष गौरव करावा कारण गाडी नादुरुस्त आहे हे माहित असूनसुद्धा स्टेरींग धरतात ते केवळ प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून एवढेच. वस्तीला जाणार्या वाहन वाहक, चालक यांच्या मनातल्या अडचणी सरकारने समजून घ्याव्यात. एस.टी. ग्रामीण प्रवाशांची जीवन वाहिनी आहे थांबता कामा नये.

महादेव गोळवसकर, ९८६९४७६२०९

# सावित्रीबाई फुलेंचे कार्य समस्त मानवजातीला भूषणावह



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२१५

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांचा  आज म्हणजे १० मार्च २०२५ रोजी १२८  वा स्मृतिदिन. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी साताऱ्याजवळील नायगाव या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव खंडूजी नेवसे असे होते. त्यांचे वडील गावचे पाटील होते. ज्या काळात स्त्रियांना घराच्या बाहेर पडायचे बंधन होते, त्याकाळात सावित्रीबाईंचा जन्म झाला.**

असे असले तरी सावित्रीबाई मात्र निडर स्वभावाच्या होत्या. त्या लहान असतांना एका दुबळ्या मुलाचे फुले पळवणाऱ्या धटिंगणाला त्यांनी अद्दल घडवली होती तसेच त्यांच्या घरासमोरील झाडावर असणाऱ्या घरट्यातील पक्षांची अंडी खाणाऱ्या नागाला त्यांनी ठेचून मारले होते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह महात्मा जोतीराव फुले यांच्याशी झाला. जोतीराव तेंव्हा तेरा वर्षाचे होते. महात्मा जोतीराव फुले म्हणजे महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक. जोतीरावांना मातृप्रेम लाभले नाही. त्यांच्या मावस भगिनी सगुणा यांनी त्यांचा सांभाळ केला. सगुणा  इंग्रज अधिकाऱ्याकडे दाई म्हणून काम करायच्या त्यामुळे त्यांना इंग्रजी कळायचे. आपल्या जोतीरावने देखील इंग्रजी फाडफाड बोलले  पाहिजे असे त्यांना वाटायचे. त्यांनी जोतीरावांना शिकण्यास प्रेरित केले. जोतीरावही शिकले नंतर जोतिरावांनी  सावित्रीबाई यांनाही शिकवले. मुलींच्या शिक्षणाचे महत्व जाणून मुलींसाठी शाळा काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ते नेहमी म्हणत एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते म्हणून १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. या शाळेत सावित्रीबाई फुले मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागल्या. या शाळेत सुरवातीला दोन मुली होत्या वर्षअखेर या शाळेतील मुलींची संख्या ४० ते ४५  पर्यंत पोहचली. पण हे चांगले काम त्याकाळातील सनातनी वर्गास रुचले नाही. मुली शाळेसाठी घराबाहेर पडू लागल्याने धर्म बुडाला अशी आरोळी ठोकत या सनातनी लोकांनी सावित्रीबाई व जोतीरावांच्या या महान कार्यास विरोध केला. सावित्रीबाई फुले यांच्या अंगावर शेण गोळे फेकले. काहींनी तर अंगावर हात टाकण्याचाही प्रयत्न केला पण फुले दांपत्य डगमगले नाही. घेतलेला वसा त्यांनी सोडला नाही. कितीही विरोध झाला तरी ध्येयापासून ते विचलित झाले नाही. जिद्दी व ध्येयवादी फुले दांपत्यांनी ज्ञानदानाचे आपले पवित्र कार्य चालूच ठेवले. जोतिरावांनी काढलेल्या शाळेत फुले दांपत्य व अन्य  शिक्षक जीव ओतून शिकवत. विद्यार्थ्यांशी ते एकरूप होत त्यामुळे त्यांच्या शाळेची प्रगती लक्षणीय होती. त्यांच्या शाळेविषयी पुणे ऑब्जर्व्हर या दैनिकामध्ये २१ मे १८५२ मध्ये लिहिले होते, जोतीराव फुलेंच्या शाळेतील मुलींची संख्या सरकारी शाळेतील मुलांच्या संख्येपेक्षा दहा पटीने जास्त आहे कारण या शाळेत मुलींना शिकवण्याची जी व्यवस्था आहे ती मुलांच्या शासकीय शाळेपेक्षा चांगली आहे. १८६३ मध्ये फुले दांपत्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीबाई त्याच्या प्रमुख होत्या. १८८५ पर्यंत ३५ विधवा ब्राह्मण स्त्रिया त्यांच्याकडे आल्या. त्यांची बाळंतपणे सावित्रीबाईंनी केली. १८७४ साली काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवा त्यांच्या घरात आल्या. या काशीबाईच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले त्या मुलाचे नाव यशवंत ठेवले. यशवंतला शिकवून त्यांनी डॉक्टर बनवले. सण १८७७ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. या दुष्काळात फुले दांपत्यांनी लोकांना खूप मदत केली. त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी जेवणाखाण्याची सोय केली. सावित्रीबाईंनी केशवपन पद्धत बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करुन  नाभिकांचा संप घडवून आणला. पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे वाहिली. सावित्रीबाई फुले या मोठ्या  साहित्यिकही होत्या. काव्यफुले व बावनकशी सुबोध रत्नाकर हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. १८९६-९७ साली पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला होता. प्लेग या जीवघेण्या आजाराने अनेकांचा जीव घेतला. हा रोग संसर्गजन्य आहे हे माहीत असूनही सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ दवाखाना सुरू केला.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२,  छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore *   Executive Editor (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# परिस्थितीशी संघर्ष करीत जीवन जगले पाहिजे : डॉ. दिगांबर नेटके

## साठे महाविद्यालयात जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबिराचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज



**मुखेड :** आपण जीवन जगत असताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. परिस्थितीशी संघर्ष करीत यश डोळ्यापुढे ठेवून विद्यार्थ्यांनी कष्ट केले पाहिजे. विद्या ग्रहण करताना अडचणी येतात म्हणून शिक्षणाकडे दुर्लक्ष न करता शिक्षण घेतले पाहिजे. जिद्द, चिकाटी आपल्या अंगी असेल तर नक्कीच आपणाला यश मिळते. असे उदगार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे ओएसडी डॉ. दिगांबर नेटके यांनी व्यक्त केले.

येथील शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि साठे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने ' नांदेड जिल्हा जिल्हास्तरीय युवक - युवती नेतृत्व विकास शिबिराचा' उद्घाटन सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी डॉ. दिगांबर नेटके बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोहर तोटरे होते. संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, प्राचार्य डॉ. हरिदास राठोड, उप प्राचार्य तथा कार्यक्रमाधिकारी प्रा. संजीव डोईबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ. मल्लिकार्जुन करजगी म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करते. या योजनेला तुटपुंजे मानधन असतानाही आपल्या विद्यार्थ्यांच्या अंगी सेवाभाव निर्माण व्हावा, त्यांच्यातील नेतृत्वगुणांना वाव मिळावा या पवित्र भावनेतून हे कार्य चालू आहे. याप्रसंगी प्राचार्य हरिदास राठोड यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी आपल्या जीवनातील अनेक प्रेरणादायी अनुभव सांगितले. अध्यक्षीय समारोहात प्राचार्य डॉ. मनोहर तोटरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की विद्यार्थी जीवनात आपण जे काही नवनवीन गोष्टी शिकतो त्या आपणाला पुढील आयुष्याला प्रेरणा देणाऱ्या असतात. वाटा निर्माण करणाऱ्या असतात. म्हणून आपण अशा शिबिरातून अनेक अनुभव स्वतः घ्यावेत आणि तुम्हाला उपलब्ध करून दिलेल्या व्यासपीठाचा पुरेपूर फायदा करुन घ्यावा. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. संजीव डोईबळे यांनी केले. प्रस्ताविकात त्यांनी रासेयो म्हणजे व्यक्तिमत्व विकास होय. या शिबिरातून तुम्हाला खूप शिकायला मिळेल आणि तुमच्यातील कलागुणांना सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळेल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. केशव पाटील यांनी तर आभार प्रा. एम एस सगरोळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. अश्विनी बावस्कर, डॉ. राम धारासुरकर, प्रा. अण्णाराव मुंडे, डॉ. महावीर उदगीरकर, डॉ. स्वानंद मुखेडकर, व्यंकट पांचाळ, प्रकाश राठोड, संजय सकनुरे यांनी विशेष परिश्रम घेतले.



**आय. एस. अधिकारी मुंबई मघुकर गिरगांवकर, सौ. मिराताई मुंडे, गोपाळ पाटील राजूरकर, रिपब्लिकन सेनेचे तालुका अध्यक्ष श्रावण नरबागे मंडलापूरकर, अनिल राठोड, सतिष डाकूरवार, राजू शिरसाठे तांदळीकर यांच्या वतीने बालाजी पाटील खतगावकर यांचे मुखेड नगरीत आगमण होताच पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.**

# शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर यांना 'कर्तृत्ववान महिला पुरस्कार 2025' प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** पहाट फाउंडेशनतर्फे प्रदान केल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय कर्तृत्ववान महिला सन्मान पुरस्कार 2025 हा यंदा अश्विनी लाठकर पानसरे, माध्यमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करण्यात आला. हा गौरव सोहळा थाटात संपन्न झाला, ज्यामध्ये शिक्षण व साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी दशसूत्री अभियान, कॉपीमुक्त अभियान, स्वच्छता अभियान, माझी शाळा सुंदर शाळा अभियान, शिक्षक साहित्य संमेलन आदी उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि समाजात शिक्षण विषयक रुची निर्माण केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल पहाट फाउंडेशनच्या वतीने रेल्वे स्टेशन जवळील एका खाजगी हॉटेलमध्ये त्यांना हा कर्तृत्ववान महिला सन्मान पुरस्कार 2025 प्रदान करण्यात आला.

पहाट फाउंडेशनचे संचालक अमोल बिलंगे, सोमनाथ चौधरी, अर्पिता सुरडकर यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. याप्रसंगी प्रसिद्ध साहित्यिक तथा व्याख्याते डॉ. संजय गायकवाड आणि डॉ. विवेक पानसरे यांची विशेष उपस्थिती होती. डॉ. गायकवाड यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात नारीशक्तीच्या योगदानावर प्रकाश टाकला. “संरक्षण आणि देवत्वाच्या नावाखाली तिचे शोषण केले गेले. तथापि, तिच्या कर्तृत्वाने ती आज वेगवेगळ्या क्षेत्रात झेपावत आहे” असे कथन करत अश्विनी लाटकर यांची केलेली निवड अतिशय सार्थ आहे याचा पुनरुच्चार त्यांनी केला. अश्विनीताई लाठकर यांनी आपल्या सत्काराला उत्तर देताना संघर्षमय वाटचालीचा आढावा घेतला. प्राथमिक शिक्षण ते शिक्षणाधिकारी पदापर्यंतचा प्रवास उलगडत त्यांनी आपल्या कुटुंबाचे योगदान अधोरेखित केले. तद्वतच शिक्षण म्हणजे विशिष्ट कालखंडापूरती मर्यादित बाब नसून तहहयात शिकणे हेच खरे शिक्षण होय, असे प्रतिपादन त्यांनी केले. या सन्मान सोहळ्यास शिक्षण विभागातील विविध अधिकारी, शिक्षक, मुख्याध्यापक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. फाउंडेशनचे संचालक अमोल भिलंगे यांनी प्रास्ताविक केले, सूत्रसंचालन अतुल घडमोडे यांनी केले, तर गणेश भुमे यांनी आभार प्रदर्शन केले.






# मुखेड नगर परिषद येथे महिलादिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** नगर परिषद कर्मचारी यांच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिप प्रज्वलीत केले. सर्व मान्यवर राष्ट्रगीत घेऊन व सावित्रीबाई फुले यांचे गीत गायीले आहे. कोमल सुक्ते यांनी पुढील कार्यक्रम सुरुवात झाली.

महाराष्ट्र राज्य नगर परिषद कर्मचारी /संवर्ग कर्मचारी संघटना शाखा मुखेड च्या वतीने 08 मार्च जागतिक महिला दिन साजरा केला आहे. मान्यवरांच्या हस्ते महिलांना स्टॉल व गुलाब पुष्प देण्यात आले. 8 मार्च जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाला उपस्थित अध्यक्ष व मराठवाडा भूषण मा.डॉ दिलीप पुंडे, उद्घाटक पोलीस निरीक्षक मा. लक्ष्मण केंद्रे, प्रमुख पाहुणे सौ. डॉ. रचिता कौरवार, शारदाताई पाटील मा. बलभीम शेंडगे, (म.रा.न.प.क सं मराठवाडा अध्यक्ष) शेख महेताब, दादाराव आगलावे, राजु रोडगे, गोविंद पाटील, सूत्रसंचालन गौतम बनसोडे, आभार प्रदर्शन तेजेराव गायकवाड यांनी केले.

# शाब्दिक वादातून पतीने चिरला पत्नीचा गळा

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** कौटुंबिक कलहातून पतीनेच पत्नीचा गळा चिरून हत्येचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार महिला दिनी घडला. शहरातील रामकृष्ण नगरात शनिवारी ८ रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास हा थरार घडला. कुंदा भूपेंद्र पाहुणे (२५) असे जखमी पत्नीचे नाव आहे. आरोपी पती भूपेंद्र (मुन्ना) गणेश पाहुणे यास तुमसर पोलिसांनी अटक केली आहे. गंभीर जखमी झालेल्या पत्नीला उपचारार्थ उपजिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# उद्योगनगरी कारेगाव येथे जागतिक महिलादिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**रिजवान बागवान**

**कारेगाव :** जिल्ह्यातील नामांकित रांजणगाव एम.आय.डी.सी परिसरातील कारेगाव येथे सार्वजनिक वाचनालय आणि संसाधन केंद्र एव्हरी डेनिसन कंपनी व संस्थेमार्फत सुरू आहे,संस्थेसाठी लागणारा आर्थिक निधी 'एवरी डेनिसन' या कंपनीच्या सी.एस.आर फंडातून रिड इंडिया संस्थेमार्फत केला जातो. या संस्थेचे कारेगाव व कर्डेलवाडी या ठिकाणी सार्वजनिक वाचनालय आणि संसाधन धन केंद्र सुरू केले आहे. या केंद्रांच्या समन्वयक पदी सुवर्णा रोहित नवले या आहेत. विविध सामाजिक कार्यक्रम तसेच सर्व प्रशिक्षण व आयोजन रिड इंडिया मार्फत केले जाते. संस्थेच्या डायरेक्टर गीता मल्होत्रा यांचे नेहमीच मार्गदर्शन मिळत असल्याचे नवले यांनी सांगितले.मोफत प्रशिक्षण मिळाल्याने प्रत्येक घटकातील स्त्री सक्षम बनत असल्याचेही त्या म्हणाल्या. ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत कारेगाव सेंटरवर महिला दिन विविध मान्यवरांच्या उपस्थित साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रांजणगाव पोलीस स्टेशनच्या पी.एस.आय सविता काळे होत्या. त्यांनी आपल्या भाषणातून महिलांवरील अन्याय व अत्याचार रोखण्यासाठी सखोल मार्गदर्शन केले तसेच महिलांच्या संरक्षणार्थ पोलीस सदैव पाठीशी आहेत असे सांगून जागतिक महिला दिनाच्या उपस्थित सर्वच महिलांना शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी कारेगाव नगरीच्या विद्यमान सरपंच वृषालीताई प्रशांत गवारे डॉ.निकिता तळेकर, सामाजिक कार्यकर्त्या व पोलीस मित्र मीनाताई गवारे, डॉ. मीना सांभारकर यांनी उपस्थित महिला भगिनींना सखोल मार्गदर्शन करत शुभेच्छा दिल्या.वरील सर्व प्रमुख पाहुण्यांचा संस्थेमार्फत सन्मान करण्यात आला. सेंटरच्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. त्यामध्ये संगीत खुर्ची, ड्रॉइंग, निबंध लेखन, भाषण यांचा समावेश करण्यात आला होता. आमच्या सेंटरवर संगणक प्रशिक्षण,बालपण विकास, शुद्ध वाचन, शुद्ध लेखन, आरी वर्क, ब्युटी पार्लर, सर्व शिवणकाम मोफत शिकवले जाते,या प्रशिक्षणाच्या माध्यमातून आम्ही महिला विद्यार्थ्यांना लाईफ स्किल, हेल्थ अवेअरनेस,पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट, वुमेन एम्पॉवरमेंट या प्रकारचे धडे घेऊन सर्वांगीण विकासाला हातभार लावला जातो, तसेच नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध करून देण्याचाही प्रामाणिक प्रयत्न करतो. तालुक्यातील व पंचक्रोशीतील सर्व वाचन प्रेमींना मोफत पुस्तके व विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी सर्व पुस्तके उपलब्ध केली जातात.असे सेंटरच्या समन्वयक सुवर्णा रोहित नवले यांनी सांगितले तसेच उपस्थित पाहुण्यांचे आभार मानले. याप्रसंगी सेंटरचे सर्व स्टाफ मेंबर व प्रशिक्षणार्थी विद्यार्थी उपस्थित होते.






# खासदार ॲड. चंद्रशेखर आझाद यांना झेड प्लस सुरक्षा प्रदान करा

## भीम आर्मीची प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भीम आर्मीचे संस्थापक खासदार एडवोकेट चंद्रशेखर आझाद यांना झेड प्लस सुरक्षा प्रदान करा, तसेच राष्ट्रीय अध्यक्ष विनय रतन सिंह राष्ट्रीय महासचिव अशोक कांबळे यांना देखील तात्काळ सुरक्षा प्रदान करण्यात यावी, यासह इतर मागण्यांसाठी भीम आर्मीतर्फे जिल्हाधिकारी कार्यालय आवारात निदर्शने करण्यात आली. तसेच प्रशासनाला मागण्यांचे निवेदन देण्यात आल. निवेदनातून परभणी जिल्ह्यातील प्रकरणी आरोपींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्यांची नार्कोटेस्ट करण्यात यावी, अशी ही मागणी करण्यात आली. निवेदनावर महाराष्ट्र उपाध्यक्ष पॅंथर राहुल वाघ, जिल्हाध्यक्ष संजय चव्हाण, उत्तर महाराष्ट्र संघटक राजाभाऊ उमाळे, जिल्हा उपाध्यक्ष दिलीप अहिरे, कोषाध्यक्ष उत्तमराव झनके यांच्यासह पदाधिकारी युवा कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

## राज्याच्या विकासाला चालना देणारा अर्थसंकल्प

आधुनिक केसरी


आ. देवराव भोंगळे, राजुरा

२०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र करण्याकरिता मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी केलेल्या संकल्पाला साजेसा असा हा अर्थसंकल्प आहे. 'महाराष्ट्रात आता थांबणार नाही आणि विकास आता लांबणार नाही' असा सुतोवाच करीत मा. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजीतदादा पवार यांनी आज मांडलेला अर्थसंकल्प म्हणजे विकसित महाराष्ट्राच्या विकासाला गती देणारा असून राज्यातील पायाभूत सुविधा, शिक्षण, कृषि, रस्तेविकास, मत्स्योद्योग, उद्योग, जलपर्यटन, ग्रामविकास, आदिवासी विकास, महिला सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन, सामाजिक न्याय, जलसंधारण, मेट्रो, रेल्वे, रस्ते वाहतुकीतून मोठा रोजगार मिळणार असून राज्याच्या विकासाला चालना देणारा आहे.

मुख्यमंत्री बळीराजा योजनेत ४५ लाख शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यासह २७ जिल्ह्यांसाठी दिवसा वीज देण्याचा संकल्प तसेच पंतप्रधान सूर्यघर योजनेला बळकटी व जनमानसावर दूरगामी परिणाम करणारा आहे.

राज्यात नवीन गृहनिर्माण धोरण, लाडकी बहीण योजनेसाठी ३६ हजार कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आल्याने जनतेत संभ्रम निर्माण करणाऱ्या विरोधकांची बोलती बंद झाली. छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य व उर्जादायी इतिहास सांगणारे आग्रा येथे प्रस्तावित असलेले भव्य स्मारक तसेच कोकणातील संगमेश्वर येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक उभारण्याचा राज्य सरकारचा संकल्प म्हणजे प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानाची बाब आहे. यासोबतच २०२७ रोजी नाशिक येथे होणारा कुंभमेळा लक्षात घेता नमामि गोदावरी व अभिजात मराठी सप्ताह हे निर्णयही मनाला समाधान देणारा आहे. नवमहाराष्ट्राचे शिल्पकार व राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री ना. अजीतदादा पवार यांच्या नेतृत्वात सुरू असलेली महाराष्ट्राची विकसित घोडदौड अधिक दमदार होईल असा मला विश्वास आहे.

# संतोष देशमुख हत्याप्रकरणी फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवून मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या

आधुनिक केसरी न्यूज



**बी. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवून मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्यावी शिवायसह आरोपीची पुरवणी आरोप पत्रामध्ये नावे समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी सकल मानवतावादी नागरिकांकडून दिनांक ८ मार्च रोजी जिंतूर कडकडीत बंद ठेऊन मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच स्व संतोष देशमुख यांच्या हत्येचे समाज माध्यमांमध्ये फोटो व्हायरल झाल्यानंतर संपूर्ण राज्यसह जिंतूर तालुक्यामध्ये आरोपी विरोधात संतापाची लाट उसळली आहे म्हणून या प्रकरणातील दोषींना कठोरात कठोर शिक्षा मिळावी हत्येप्रकरणाचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून दोषींना तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी हत्येच्या दिवशी आरोपींना सहकार्य करणारे सर्व पोलीस काही दोषी राजकीय नेते त्यांनाही सहआरोपी करत पुरवणी आरोपत्रात त्यांची नावे घेत इतर आरोपींना तात्काळ अटक करून कार्यवाही करावी अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे. दरम्यान या मागण्यांच्या समर्थनार्थ आणि स्व. संतोष देशमुख यांना न्याय मिळावा यासाठी जिंतूर तालुक्यातील सकल मानवतावादी नागरिकांनी एकत्र येत शहर कडकडीत बंद केले. यावेळी व्यापाऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला असून आपापली प्रतिष्ठाने बंद ठेऊन सहकार्य केले आहे. यावेळी तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना निवेदन देण्यात आले आहे.

# बळीराजाशी गद्दारी करण्याचे पाप महायुती सरकारचे : विजय वडेट्टीवारांची सरकारवर सडकून टीका



आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. शाम हेडाऊ**

**मुंबई :** ज्यांच्या मतांवर महायुती सरकार सत्तेत आले त्याच लाडक्या बहिणी, शेतकरी, वंचित, आदिवासी यांचा महायुतीने विश्वासघात केला. निवडणुकी आधी गुलाबी जॅकेट घालून फिरणारे आता गुलाबी जॅकेट ही विसरले आणि लाडक्या बहिणींना विसरले अशी टीका काँग्रेस विधी मंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

महायुती सरकारचा पहिला अर्थसंकल्प आज अर्थमंत्री अजित पवार यांनी मांडला. पण या बजेट मध्ये लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याची घोषणा करण्यात आलेली नाही, लाडक्या बहिणींचा उल्लेख ही भाषणात नाही. एकीकडे लाडकी बहिण योजनेत वेगवेगळे निकष लावून महिलांना अपात्र केले जात आहे दुसरीकडे निधी वाढवून दिला नाही यावरून तिजोरीत खडखडाट असल्याचे स्पष्ट आहे असे विधी मंडळ नेते वडेट्टीवार म्हणाले.

या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांशी देखील सरकारने गद्दारी केली आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार असे आश्वासन महायुती सरकारने निवडणुकीत दिले होते पण आज अर्थसंकल्पाच्या भाषणात बळीराजाच्या पदरी निराशा आली आहे ,त्यामुळे महायुती सरकार क्या हुआ तेरा वादा? बँका आता शेतकऱ्यांना कर्ज देणार नाही याला कोण जबाबदार असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. या अर्थसंकल्पात मुंबई, पुणे येथील पायाभूत सुविधांच्या प्रकल्पाना भरघोस निधी देण्यात आला, उरलेला निधी नागपूर येथील प्रकल्पाना देण्यात आला. पण ग्रामीण भागातील योजना, प्रकल्पाकडे दुर्लक्ष करण्यात आले. शहरी भागातील प्रकल्प म्हणजे कंत्राटदारांसाठी हे बजेट आहे का? दलित, वंचित, आदिवासी सर्वसामान्यांचा विसर या सरकारला पडल्याची टीका विधीमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. अर्थसंकल्प झाल्यावर महाविकास आघाडीने विधान भवनाच्या पायऱ्यांवर महायुती सरकार विरोधात आंदोलन केले. हा अर्थसंकल्प म्हणजे फक्त घोषणांचा सुकाळ,निधीचा मात्र दुष्काळ आणि सरकारची जुमलेबाजी या अर्थसंकल्पातून दिसली, असा संताप विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला.

# कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनचा धुळे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** वारंवार निवेदने देऊन प्रशासनाकडे मागण्या मांडल्या. आंदोलने ही केली. 14 जानेवारी 2025 रोजी सर्व विभाग आणि मंत्री महोदयांना मागण्यांसंदर्भात संघटनेने सविस्तर पत्र दिले. 5 फेब्रुवारी 2025 रोजी राज्यातील सर्व विकासाची कामे बंद केली आहेतच. परंतु शासनाने अद्यापही या संदर्भात काहीही उपाययोजना आणि कार्यवाही केली नाही. यामुळे 10 मार्च रोजी धुळे जिल्हा कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन तसेच महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. राज्यातील इतर जिल्ह्यांमध्येही याच दिवशी हा मोर्चा काढण्यात आला. मोर्चेकऱ्यांनी धुळे जिल्हा प्रशासनाला मागण्यांचं निवेदन सादर केलं. असोसिएशनचे अध्यक्ष संदीप महाले यांच्या नेतृत्वाखाली या मोर्चा आंदोलनात प्रकाश पांडव दीपक भामरे,अभिनय गीते, इंजिनियर आशिष अग्रवाल,संजय पाटील, अमृत पाटील, डी के पाटील शितल नवले,अरविंद राजपूत, केदार जोशी यांच्यासह धुळे जिल्हा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे पदाधिकारी आणि सभासद सहभागी झाले होते.



# आंतरिक शक्तीला सकारात्मक विचारांनी सजवणे महत्वाचे

## ॲड. आशिष धर्मपुरीवार : जागतिक महिलादिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** चिंतामणी कॉलेज ऑफ कॉमर्स, चिंतामणी कॉलेज ऑफ सायन्स आणि चिंतामणी कॉलेज पोंभुर्णा यांच्या अंतर्गत तक्रार समिती द्वारा आयोजित जागतिक महिला दिन दिनांक ०८/०३/२०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ता ॲड. आशिष धर्मपुरीवार तर मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. अलका सावलीकर या उपस्थित होत्या. याप्रसंगी मंचावर प्राचार्य डॉ. वेगिनवार, प्रा. डॉ चौधरी, प्रा. डॉ. नक्षीने उपस्थित होते.
ॲड. धर्मपुरीवार यांनी याप्रसंगी स्त्री विषयक कायदे - वापर व गैरवापर या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच लिंग समानता या विषयावर सुद्धा मार्गदर्शन करण्यात आले.

ॲड. धर्मपुरीवार यांनी त्यांच्या मार्गदर्शनात प्रत्येक महिलेला रोजचे आयुष जगतांना असंख्य संकटांना सामोरे जावे लागतं. त्याला तोंड देण्यासाठी तिला काही कायदे-अधिकार तसेच मार्गदर्शक तत्वे माहिती असणे फार गरजेचे आहे. त्यात त्यांनी मार्गदर्शन करतांना कायदया मधील खालील तरतुदींची माहिती दिली. कौटुंबिक छळ (महिला संरक्षण) प्रतिबंधक कायदा स्त्रीला कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक व शारीरिक संरक्षण देतो. अश्लीलताविरोधी कायदा महिलांशी अश्लील वर्तन करणाऱ्यांना शिक्षा देण्याची तरतूद आहे. हुंडा प्रतिबंधक कायद्यान्वये हुंडा मागणे आणि हुंडा देणे गुन्हे आहेत. बालविवाहाची प्रथा बंद करण्यासाठी 'बालविवाह प्रतिबंधक अधिनियम आहे. छेडछाड करणे गुन्हा स्त्रीची अब्रू लुटणे, हात धरणे, तिच्या वस्त्रांना हात लावणे अशा प्रकारे विनयभंग करणाऱ्यांना कायद्यात शिक्षेची तरतूद आहे. एखाद्या स्त्रीचा घटस्फोट झाल्यास तिच्या पाच वर्षापर्यंतच्या मुलांना ती स्वतःजवळ ठेवू शकते. मात्र पाच वर्षांहून अधिक वयाच्या मुलांच्या बाबतीत कोर्टाचा निर्णयच बांधील असतो.

समान वेतन कायद्यानुसार एकाच कामासाठी स्त्री व पुरुष दोघांना समान वेतन मिळाले पाहिजे. विशिष्ट कार्यक्षेत्रातील नोकऱ्या सोडता अन्य ठिकाणी स्त्रियांना रात्र पाळीला कामाला बोलावता येत नाही.

भारतीय भारतीय नागरिक सुरक्षा साहिंता कलम १४४ अनुसार स्त्रीला पोटगीची मागणी करण्याचा हक्क आहे. हिंदू विवाह कायदा १९५५ कलम २४ व २५ नुसार अर्ज दाखल केल्यानंतर कोर्ट पोटगीची रक्कम देण्याचे आदेश देते. नोकरीपेशातील स्त्रियांसाठी बाळंतपणाची आणि नवजात बाळाची देखभाल करण्यासाठी रजेची तरतूद असून त्या काळात स्त्रीला विशिष्ट दिवसाची भर पगारी रजा मिळते. मात्र कायद्यानुसार ती रजा व इतर फायदे फक्त दोन बाळंतपणासाठी असतात. गर्भपात झाल्यावरही स्त्रीला भरपगारी रजा मिळण्याची तरतूद कायद्यात आहे. स्त्री भूण हत्या रोखणे व गर्भांचे लिंग जाणून घेण्याच्या तंत्राचा दुरुपयोग करणे यावर अंकुश ठेवण्यासाठी प्रसूतीपूर्व निदान आणि तंत्रज्ञान विनिमय व दुरुपयोग निवारण अधिनियम १९९४ आहे. महिलाचे शोषण व छळ होऊ नये म्हणून हायकोर्टाच्या आदेशानुसार प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा महिला सहाय्यता समिती स्थापन झाली आहे. होणारे शोषण किंवा छळ याबद्दलची तक्रार या समितीकडे महिला लेखी स्वरूपात देऊ शकते. तसेच, न्याय मिळण्यासाठी कायदेशीर सल्लागार व स्वयंसेवी संस्थांची व्यवस्था समितीतर्फे केली जाते.

नोकरीच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ थांबवण्यासाठी सुप्रीम कोर्टाने मार्गदर्शक तत्वे लागू केली आहेत. खासगी, सार्वजनिक तसेच अन्य संस्थामध्येसुद्धा ती लागू आहेत. लैंगिक चाळे आणि तक्रारी थांबवण्याची जबाबदारी संबंधित संस्थांवर तसेच कर्मचाऱ्यांवर आहे. तसेच, तक्रारींच्या झटपट निवारणासाठी प्रत्येक विभागात महिला अध्यक्षासह अर्ध्यापेक्षा अधिक महिला असणारी समिती स्थापन करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

महिलांना फक्त महिला पोलिस सूयोर्दयानंतर आणि सूर्यास्तापूर्वी अटक करू शकतात. कुटुंबाच्या सदस्याच्या उपस्थितीत व योग्य कारण असेल तरच स्त्रीला पोलिस ठाण्यात चौकशीसाठी बोलावता येते. स्त्रीला अटक केल्यास तिला फक्त महिला कक्षामध्येच ठेवता येते. महिलांना संवैधानिक व न्यायिक सुरक्षा आणि अधिकार देण्यासाठी ३१ जानेवारी १९९२ रोजी महिला आयोगाची स्थापना झाली. प्रत्येक राज्यातही महिला आयोग स्थापन झाला आहे. महिला कोणतीही तक्रार थेट महिला आयोगाकडे करू शकतात. आयोगाला सिव्हिल कोर्टाप्रमाणे चौकशी आणि तपासाचे अधिकार आहेत. हा आयोग वेळोवेळी सरकारला महिला कल्याणाच्या योजनाही सादर करतो.

ॲड. आशिष धर्मपुरीवार यांनी त्यात पुढे असे मत मांडले की, शासन व कायदा हे त्यांचे काम करेलच परंतु महिलांना त्यांच्या हक्कांसाठी आधी स्वतःशीच लढावे लागेल, जेणेकरून त्या जगाशी लढतांना बळकट होऊ शकतील. पहिला आणि सर्वात महत्वाचा टप्पा म्हणजे आत्मविश्वास वाढवून आत्मसन्मान मिळवणे. महिलांनी त्यांचे महत्त्व समजून घेऊन स्वतःची काळजी घेऊन त्यांचा सन्मान वाढवला पाहिजे. आत्म-सन्मान विकसित करतांना, आपल्या आंतरिक शक्तीला सकारात्मक विचारांनी सजवणे महत्वाचे आहे. जेव्हा महिलांना सशक्त आणि सन्माननीय वाटेल, तेव्हाच त्या समाजात त्यांची ओळख योग्य पद्धतीने प्रस्थापित करू शकतीलअसे मत मांडले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापिका डॉ.नरवाडे, संचलन प्राध्यापिका मेश्राम यांनी केले. तर आभारप्रदर्शन प्राध्यापिका कुलकर्णी यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे असंख्य विद्यार्थी व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संखेने उपस्थित होते. या कार्यक्रमच्या यशस्वीतेकरिता महाविद्यालयीन विद्यार्थी व कर्मचारी यांनी अथक प्रयत्न केलेत.



# रायझिंग स्टार इंग्लिश स्कूलमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी निमित्त विविध उपक्रम. भारतात स्त्री शिक्षणाचा पाया घालणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची आज पुण्यतिथी रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये साजरी करण्यात आली, यामध्ये मुख्याध्यापक विश्वंभर नलावडे, प्राचार्य योगेश इंगळे यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मुलांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ऋषिकेश वेताळ,अमोल सोळुंके अनमोल गवई, ज्ञानेश्वर नलावडे सर अनिल काळे,मनीषा गायकवाड, पूजा नलावडे, सीमा शेळके, आफरीन आत्तार, अलका काथार, शुभांगी तायडे, रूपाली गायकवाड, निकिता खुटे, प्रतीक्षा काळे, अलका चंदनसे यांनी परिश्रम घेतले.





# ज्येष्ठ पत्रकार प्रा. सुभाष शेटे दै. संध्याच्या आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**कवठे येमाई :** पत्रकारिता क्षेत्रात सामाजिक प्रश्नांची सोडवणूक तीही प्रामाणिकपणे व विनाशर्त करण्याचे ध्येय ठेवल्यास तो पत्रकार खऱ्या अर्थाने लोकशाहीच्या चौथ्या स्तंभास अनुसरून कार्य करताना दिसून येतो अशा प्रामाणिक पत्रकारांची नक्कीच दखल घेतली जाते. मागील २० वर्षांपासून पत्रकारितेतून विविध सामाजिक प्रश्न निस्वार्थपणे विविध माध्यमातून मांडून त्या प्रश्नांची सोडवणूक करण्याकामी सतत प्रयत्नशील असणारे वरिष्ठ पत्रकार प्रा.सुभाष अण्णा शेटे यांना नुकतेच दैनिक संध्या व संध्या न्यूज लाईव्ह चॅनेलच्या वतीने आदर्श पत्रकार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. दै.संध्या चे संचालक मा.आमदार संजय जगताप व संपादिका ज्योती नाळे यांनी पत्रकार शेटे मागील अनेक वर्षांपासून प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, सोशल मिडीयाच्या माध्यमातून करीत असलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत त्यांना जागतिक महिला दिनी पुण्याच्या दै संध्या कार्यालयात ,युवा क्रांती फाऊन्डेशन अंतर्गत पोलीस मित्र, ग्राहक,पत्रकार संरक्षण, माहिती अधिकार संघटनेच्या पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा वर्षाताई नाईक, कार्यालय लिपिक निकिता रसाळ, सेवानिवृत्त इन्कम टॅक्स इन्स्पेक्टर श्रीकांत अष्टेकर यांच्या हस्ते हा पुरस्कार पत्रकार शेटे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. पत्रकारिते व्यतिरिक्त जेष्ठ पत्रकार प्रा. सुभाष शेटे हे युवा क्रांती फाउंडेशन अंतर्गत पोलीस मित्र, ग्राहक, पत्रकार संरक्षण, माहिती अधिकार संघटनेचे महाराष्ट्र मिडीया प्रमुख, मार्गदर्शक तथा राष्ट्रीय किसान विकास मंच चे महाराष्ट्र प्रदेश प्रमुख म्हणून प्रभावीपणे कार्य करीत आहेत. जेष्ठ पत्रकार प्रा.सुभाष अण्णा शेटे यांना हा आदर्श पत्रकार पुरस्कार मिळाल्याबद्दल माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील,राज्याचे माजी सहकार मंत्री, या भागाचे लोकप्रिय आमदार दिलीपराव वळसे पाटील, माजी आमदार पोपटराव गावडे, युवानेते राजेश भैय्या सांडभोर, चेअरमन अशोकराव गावडे, पत्रकार मित्र व मित्र परिवारा सह युवा क्रांती संघटनेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष रविंद्र सूर्यवंशी, राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा तक्रार समिती अध्यक्ष हभप नाना महाराज कापडणीस, महाराष्ट्र प्रदेश युवा अध्यक्ष शिवाजीराव शेलार,राष्ट्रीय संघटक डॉ.राजेश्वर हेंद्रे व संघटनेतील अनेक पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या आहेत.




# वाकी येथील सरपंच दांपत्याचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**चिंचोली लिंबाजी :** वाकी (ता. कन्नड) येथील माजी सरपंच श्रीराम जंजाळ व त्यांच्या पत्नी विद्यमान उपसरपंच सुनंदा श्रीराम जंजाळ यांचा रविवार (ता.९) अहिल्यानगर येथे महाराष्ट्र राज्य सेवा संघाच्या वतीने आदर्श सरपंच व आदर्श व्यक्तिमत्व म्हणून सन्मान करण्यात आला. हा पुरस्कार माऊली सभागृह, अहिल्यानगर येथील भव्यदिव्य कार्यक्रमात स्वराज्य सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य संघटनेचे राज्याध्यक्ष यादवराव पावसे पाटील, बाबासाहेब पावसे पाटील यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी पुरस्कार स्विकारतांना विद्यमान उपसरपंच सुनंदा जंजाळ, आदर्श सेवा निवृत्त शिक्षक यादवराव जंजाळ, श्रीराम जंजाळ, ग्रामपंचायत सदस्य धनराज पवार, ताराबाई धनराज पवार, ग्रामपंचायत पाणीपुरवठा कर्मचारी हरिश्चंद्र जंजाळ, सुनिताबाई जंजाळ, आकाश जंजाळ, भावना जंजाळ, मोहीनी पवार आदी यावेळी उपस्थित होते.



# रामकृष्ण विद्यामंदिर शाळेत महिलादिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगांवराजा :** रामकृष्ण विद्यामंदिर, दे. राजा येथे जागतिक महिला दिन' साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री जी. एल.व्ही.देशमुख, प्रमुख पाहुणे श्रीमती एन. जे. श्रीसुंदर उपस्थित होत्या. प्रमूख पाहुण्यांच्या हस्ते प्रथम शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नंतर प्रमुख पाहुणे यांनी भाषणात 'जागतिक महिला दिनाच्या' शुभेच्छा दिल्या व मुलींना जीवनात कठीण परिश्रम करून उत्तुंग भरारी घेण्यासाठी प्रेरीत केले. शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री.जी. एल.व्ही. देशमुख सरांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रम ला शाळेतील सर्वच महिला शिक्षिका उवस्थित होत्या सर्वच महिला शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, त्यानंतर श्री के. टी. चव्हान सरांनी उपस्थित मान्यवरांचे,शिक्षकांचे, विदयार्थ्यांचे आभार मानले आणि कार्यक्रमचा समारोप झाला.

# गडचिरोलीत मल्टीमीडिया छायाचित्र पॅनल प्रदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मल्टीमीडिया छायाचित्र पॅनल प्रदर्शनाचे आयोजन पंचायत समिती गडचिरोली येथे करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासन, सामाजिक न्याय विभाग, जिल्हा माहिती कार्यालय व पंचायत समितीच्या संयुक्त विद्यमाने या प्रदर्शनाचे आयोजन १० मार्च ते १२ मार्च या कालावधीत करण्यात आले आहे. या प्रदर्शनात शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या योजना, दिव्यांग आणि वृद्धांसाठी उपलब्ध सहकार्य, तसेच अनुसूचित जाती-जमातीसाठी राबविल्या जाणाऱ्या विशेष उपक्रमांची माहिती छायाचित्र आणि मल्टीमीडियाच्या माध्यमातून सादर केली जाणार आहे.

# जिजाऊ विद्या संकुलात शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**तानाजी शेळगांवकर**

**नायगाव :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती  येथून जवळच आसलेल्या खंडगाव (बेंद्री) ता.नायगांव येथील जिजाऊ विद्या संकुलात काल शनिवारी जागतीक महिला दिनाचे औचित्य साधून उत्साह पूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी शिवव्याख्याते तानाजी महाराज वासरीकर यांचे व्याख्यान झाले. या जयंती सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी  बाबुराव पाटील शिंदे हे होते तर प्रमुखअतिथी म्हणून दिगांबर पा.कदम, पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र मारकड, शिवसेनेचे तालुका प्रमुख रविंद्र भिलवंडे, सरपंच आनंदराव डुमणे, नागनाथ अनंतवाड, संचालक भास्कर पा.शिंदे, राजू पा.शिंदे, सुरज कदम आदींची उपस्थीती होती. प्रारंभी सकाळी दहा वाजता ढोल ताशाच्या निनादात महाविद्यालय परिसरात छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली असून यावेळी जिजाऊ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कॉलेजचे विद्यार्थी व विद्यार्थीनी, प्राध्यापक, प्राध्यापिका यांनी मराठमोळा पेहराव परिधान करून या शिवजन्मोत्सव सोहळ्यामध्ये स्वंयस्फुर्तपणे सहभाग नोंदवला असल्याचे दिसून आले.
हा शिवजन्मोत्सव सोहळा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य बाबू आनमुलवाड यांसह विद्यार्थीनी मोलाचे परीश्रम घेतले.



## चतुर्थश्रेणी सरकारी कर्मचारी संघटनेच्या उपाध्यक्षपदी संजय नंदाने

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्याच्या राज्य कामगार विमा योजनेच्या अधिपत्याखालील असलेल्या राज्यातील सर्व रुग्णालयातील गट-ड (चतुर्थश्रेणी) संघटनेच्या राज्य



उपाध्यक्षपदी राज्य कामगार विमा योजना रुग्णालय छ.संभाजीनगर येथील कर्मचारी संजय नंदाने यांची निवड करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांचे महत्त्वाचे प्रश्न समस्या व जिव्हाळ्याच्या प्रमुख मागण्या शासन दरबारी सोडविण्यासाठी राज्य सरकारी गट-ड (चतुर्थ श्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, महाराष्ट्र पदाधिकाऱ्यांची एकत्रित सभा रविवार दिनांक 2 मार्च 2025 रोजी दुपारी 1 ते 3 या वेळेत कामा व अल्ब्लेस रुग्णालय मुंबई येथे आयोजित केली होती. त्यावेळी चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे राज्याध्यक्ष श्री. भाऊसाहेब पठाण, सरचिटणीस बाबाराम कदम तसेच मुंबई जिल्हा चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री. करण सोनवणे सहचिटणीस श्री. पराग आडीवरेकर खजिनदार श्री. बाळा सावर्डेकर यांनी संघटनेचे महत्त्व पटवून देण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर राज्य कामगार विमा योजना रुग्णालये चतुर्थश्रेणी सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र च्या नवीन 34 पदाधिकाऱ्यांची राज्य कार्यकारिणी तयार करण्यात आलीण् सदर राज्य कार्यकारिणी सन 2025 ते 2028 या त्रैवार्षिक कालावधीसाठी कार्यरत असणार असून, या संघटनेच्या अधिपत्याखालील मुंबई मधील वरळी, कांदिवली, मुलुंड व मुंबई नजिकची ठाणे, उल्हासनगर, वाशी -नवी मुंबई, येथील रुग्णालयातील स्थानिक संघटना मुंबई जिल्हा चतुर्थश्रेणी सरकारी कर्मचारी संघटनेला संलग्न असणार आहेत. तसेच पुणे -चिंचवड, औंध, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सोलापूर, नागपूर या जिल्ह्यातील स्थानिक संघटना, राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी)कर्मचारी मध्यवर्ती महासंघाला संलग्न असणार आहेत. संघटनेत अध्यक्ष कैलाश शारदुल, बाळाराम सावर्डेकर सरचिटणीस, प्रमोद उरणकर कार्याध्यक्ष, पांडुरंग जाधव खजिनदार, विजय सुरवसे उपाध्यक्ष,  कृष्णदेव सोनावले उपाध्यक्ष, अमित लाहोट सहसचिव यांच्यासह 34 पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

## वाघोळा येथे सर्वरोग निदान व आरोग्य तपासणी शिबिर

### शिबिरात 475 रुग्णांची आरोग्य तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वाघोळा येथे जागतिक महिला दिन व श्री मणीरत्नेश्वर महादेव मंदिर महायज्ञ व श्री स्पटीक शिवलिंग प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित मोफत सर्वरोग निदान शिबिर व मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन गायत्री आश्रमाचे महंत स्वामी श्री विशुध्दानंद तीर्थ यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिराचा 475 जणांनी लाभ घेतला असून यात महिलांची संख्या लक्षणीय होती.  या शिबिरात तपासणी करून मोफत औषधी वाटप करण्यात आली.
वाघोळा येथील महायज्ञाचा रविवार रोजी सांगता व जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून माजी पंचायत समिती सदस्या तथा भाजपा जिल्हा सरचिटणीस ऐश्वर्याताई अभिषेक गाडेकर व राजमुद्रा सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अभिषेक गाडेकर यांच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या माध्यमातून हे शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात स्त्रीरोग, अस्थिरोग, नेत्ररोग, औषध विज्ञान शास्त्र विभाग, बालरोग, कान, नाक, घसा इत्यादी विभागाच्या सर्व तपासण्या तसेच अत्याधुनिक सुविधा असलेली डायगोनोस्टीक व्हॅनच्या माध्यमातून रक्तांच्या संबंधित सर्व चाचण्या इ. सर्वरोग तपासणी करण्यात आली. तसेच मोफत औषधी रुग्णांना वाटप करण्यात आली आहे. तर शिबिर यशस्वीतेसाठी अभिषेक गाडेकर, श्रीमंत गायकवाड, संजय कावळे, सचिन गायकवाड, विलास दानवे, परमेश्वर काकडे,निवृत्ती तरटे, रामू गायकवाड,  कृष्णा गाडेकर, एमजीएमचे जनसंपर्क अधिकारी निजाम पठाण, जातेगाव आरोग्य केंद्राचे डॉ. लोंढे आदींनी सहकार्य केले.




## नाभिक संघटनेच्या शहराध्यक्षपदी अमोल बोबडे यांची निवड



आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव मही :** येथील सामाजिक कार्यकर्ते पत्रकार अमोल बोबडे यांची नाभिक संघटनेच्या शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली. राष्ट्रसंत शिरोमणी संत सेना महाराज यांच्या ८३५ व्या जयंतीनिमित्त सभागृहामध्ये आयोजित कार्यक्रमात संत शिरोमणी सेना महाराजांच्या प्रतिमेचे नाभिक समाज बांधवांच्या वतीने पुष्पहार घालून पूजन करून अभिवादन करण्यात आले.यावेळी अमोल बोबडे,कैलास राऊत यांनी सेना महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.दरम्यान महाराष्ट्र राज्य नाभिक महामंडळाच्या देऊळगाव मही शाखेच्या शहराध्यक्षपदी पत्रकार अमोल बोबडे यांची एकमताने निवड करण्यात आली. यावेळी गणेश जाधव, उपाध्यक्ष ऋषी गुडघे, बाळूमामा जाधव,अमोल राऊत, परमेश्वर गुडघे, गजानन गुडगे, ऋषिकेश तांदळे, विष्णू वखरे, परमेश्वर जाधव, शिवशंकर तांदळे, हरिदास वाघ,पिंटू राऊत, दादाराव बोर्डे,राजेश जाधव, सचिन राऊत, नाना बोबडे,अरुण झगरे,  मनोहर जाधव,दत्ता पवार आदी समाज बांधव उपस्थित होते. अमोल बोबडे यांच्या या नियुक्ती बद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## एम.आय.टी. रोटेगाव येथे जागतिक महिला दिनानिमित्त 'महिला सक्षमीकरण'

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** एम.आय.टी. पॉलिटेक्निक, रोटेगाव येथे जागतिक महिला दिनानिमित्त "महिला सक्षमीकरण" या विषयावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती अश्विनी लाठकर-पानसरे, ज्येष्ठ पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्या मंगल खिवंसरा आणि वैजापूर शहराच्या माजी नगराध्यक्षा आनंदी अन्नदाते उपस्थित होत्या. अश्विनी लाठकर-पानसरे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात स्त्रियांमध्ये आकाश व्यापण्याची शक्ती असल्याचे सांगितले. आधुनिक काळात शिक्षण, व्यवसाय आणि सामाजिक कार्यात त्यांचे वाढते योगदान ओळखून त्यांना पाठिंबा देण्याची गरज त्यांनी स्पष्ट केली. तसेच, स्त्रियांनी आत्मविकासाला प्राधान्य द्यावे यावर भर देताना, ग्रामीण समाजातील बदलत्या परिस्थितीत स्त्रियांची जबाबदारी आशादायक असल्याचे त्यांनी नमूद केले. यासाठी प्रत्येक स्त्रीने स्वतःसाठी वेळ देणे अत्यंत गरजेचे आहे, असेही त्या म्हणाल्या.

मंगल खिवंसरा त्यांनी स्त्री चळवळीतील मागील पन्नास वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेत राजा राममोहन रॉय व महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या कार्याला पुढे न्यायचे असल्याचे मत व्यक्त केले. जातीभेद नष्ट व्हावा व स्त्री-पुरुष समानता यावी यासाठी विविध संस्थांद्वारे आपण कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, 70 हजार आदिवासींना जातीचे प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. घरातील स्त्रीला महत्त्वाचे स्थान मिळवून देण्यासाठी सातबारावर तिचे नाव असावे यासाठी देखील त्यांनी आपला ठाम आग्रह व्यक्त केला. तंत्रज्ञानाच्या गैरवापरामुळे स्त्रियांवरील अन्याय वाढत असून, विशेषतः स्त्री भ्रूणहत्येचे प्रमाण चिंताजनक आहे. बालविवाह रोखण्यासाठी सरकार आणि सामाजिक संस्था प्रयत्नशील असल्या तरी त्यानंतर मुलींच्या शिक्षण व भविष्याबाबत पुरेशी काळजी घेतली जात नाही. तसेच, महिलांविरुद्ध अत्याचाराच्या घटना सातत्याने घडत असून, यावर प्रतिबंध घालण्यासाठी समाजातील प्रत्येकाने पुढाकार घेण्याची गरज आहे, यावर विशेष भर दिला.
आनंदी अन्नदाते यांनी स्त्रियांमध्ये संघर्षाची जिद्द असणे आवश्यक असल्याचे सांगितले. अन्याय सहन करण्याऐवजी त्याविरुद्ध लढा देण्याचे आवाहन त्यांनी केले. स्त्री-पुरुष समानतेसाठी प्रत्येक कुटुंबाने आपल्या मुलींना सक्षम करण्यावर भर द्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले. ग्रामौद्योगिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. यज्ञवीर कवडे  यांनी अध्यक्षीय समारोप करतांना तंत्रशिक्षणाचे महत्त्व विशद केले. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. नाहीतर आपल्याला फार मोठ्या संकटाला सामोरे जावे लागेल, याची जाणीव करून दिली. ग्रामीण भागात औद्योगिक क्षेत्राची वाढ होण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.  डायरेक्टर प्रा. डॉ. निलेश पाटील, एम.आय.टी. छत्रपती संभाजीनगर, यांनी मुलींना सर्व क्षेत्रात मोठ्या संधी उपलब्ध असल्याचे सांगितले आणि त्यांनी या संधींचा लाभ घ्यावा, असे सुचवले. वैजापूरचे शिक्षणविस्तार अधिकारी  मनिष दिवेकर यांनी स्त्री ही घराच्या विकासाचा आधारस्तंभ असल्याचे नमूद केले.




संस्थेचे प्राचार्य प्रा. किशोर पाटील यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाची प्रस्तावना सादर केली. ग्रामौद्योगिक शिक्षण मंडळाच्या संचालिका प्रा. डॉ. शकुंतला लोमटे यांनी ऑनलाइन पद्धतीने या कार्यक्रमात सहभाग घेऊन उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला जिल्हा परिषद, वैजापूर परिसरातील जवळपास 200 शिक्षक-शिक्षिका तसेच एम.आय.टी. पॉलिटेक्निक, रोटेगाव येथील सुमारे 700 विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जि.प.प्रा.शाळा तुकारामवाडी केंद्र खंडाळा येथील सहाय्यक शिक्षक मनोज सोनवणे व प्रा. विवेक जोशी यांनी केले तर प्रा. मनीषा जाधव यांनी आभार प्रदर्शन केले.
हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. बाबासाहेब सोनवणे, एम.आय.टी. छत्रपती संभाजीनगर आणि एम.आय.टी. रोटेगाव येथील डीन अकॅडमिक्स प्रा. स्वप्निल पाठक, प्रशासकीय अधिकारी प्रा. बाबासाहेब खरात, सर्व विभाग प्रमुख प्रा. विजय तळेकर, प्रा. विलास जाधव, प्रा. सूर्यकांत जगताप, प्रा. सत्येंद्र राम, प्रा. निलेश सोनवणे व प्रा. श्याम गाडेकर तसेच प्रा. गणेश भिसे, प्रा. किरण पाटील, प्रा. दिगंबर आव्हाळे, प्रा. अमोल निकम, प्रा. अश्विनी राजपूत, प्रा. दीपाली भालेकर, प्रा. हरीश कुमावत, श्री योगेश कलात्रे यांनी विशेष प्रयत्न केले.

# समाजासाठी काम करणाऱ्या साधुसंत, महंतांच्या आश्रमांना दान धर्म करा

## स्वामी अरुणा गिरीजी महाराज यांचे भाविकांना आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**वेरूळ :** येथील नाथ आश्रम येथे दि ८ मार्च शनिवार रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत काल्याचे किर्तन रुपी सेवेत अडबंगनाथ संस्थान प्रमुख भामाठाण सद्गुरु अरुणा गिरी महाराष्ट्रभर जी महाराज यांनी या ठिकाणी आलेल्या भाविकांना हिंदू संस्कृती टिकवण्यासाठी महाराष्ट्रभर चालू असलेल्या विद्यार्थ्यांची गुरुकुल व आक्काताई महाराज यांनी वेरूळ या ठिकाणी नाथ आश्रममध्ये विविध विकासात्मक कामांची सुरुवात येणाऱ्या भक्तांसाठी केलेली असून त्यासाठी प्रत्येक भक्तांनी या कामासाठी आर्थिक मदत करा, असे आपल्या कीर्तनातून अरुणात गिरीजी महाराज आपल्या कीर्तनादरम्यान आलेल्या सर्व भाविकांना भावनिक होऊन आवाहन केले.

या ठिकाणी गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब यांच्या विशेष सहकार्यातून चालू असलेल्या मदत कार्याबद्दल व शेवटच्या दिवशीच्या काल्याचा महाप्रसाद या ठिकाणी भाविकांसाठी दिल्याबद्दल नाथ आश्रमाच्या वतीने सद्गुरु आक्काताई जी महाराज व सर्व नाथ भक्त मंडळींच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. छत्रपती संभाजी नगर जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष एल जी गायकवाड, वेरूळ गावचे सरपंच कुसुमताई प्रकाश मिसाळ, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, छत्रपती संभाजीनगर कृषी उत्पन्न बाजार समिती अध्यक्ष राधाकिसन बापू पठाडे, माजी सभापती अर्चना दिनेश अंभोरे, भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील नलावडे, माजी सभापती भीमराव खंडागळे, माजी उपसभापती दिनेश अंभोरे, शहराध्यक्ष परसराम बारगळ, फुलंब्री पंचायत समिती माजी सभापती विवेक बापू चव्हाण ह. भ.प. नारायण महाराज भांबर्डे, अरुण आघाडे, सोमीनाथ जाधव, संदिप अधाने, रेखा चव्हाण,तालुका सरचिटणीस सतीश दांडेकर, बाळु नलावडे, संतोष गायकवाड, अनिल करपे, गणेश सावजी, इंदापूर ग्रामपंचायत चे सरपंच संदीप पाटील निकम ,माजी नगरसेवक परसराम बारगळ, संजय खंडागळे, सुखदेव ठेंगडे, कैलास मिसाळ, आचारी सेवा काय बाबासाहेब भाऊ घुगे, मंडप सेवा विजय मंडप बोरसे दामू गवळी अण्णा, अरुण कदम पुंजाराम धोत्रे गणेश गायके मते मामा विठ्ठल गोम लाडू  पहिल्या दिवसापासून ते शेवटच्या दिवसापर्यंत हातनूर या ठिकाणच्या वारकरी शिक्षण संस्थेच्या गुरुवर्य व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन केले . या ठिकाणी छत्रपती संभाजी नगर येथून आलेल्या प्रसिद्ध भारुडकार ज्येष्ठ पत्रकार ह भ प नारायण महाराज भांबर्डे यांच्यासह अनेक मान्यवरांनी भारुडात भाग घेतला. (नाथ आश्रम वेरूळ येथे दि १ मार्च ७ मार्च दरम्यान  संगीतमय भागवत कथेचा भव्य प्रकारे सद्गुरु आक्काताई महाराज व, सर्व नाथ भक्त यांच्या पुढाकारातून कथा प्रवक्ते अशोक महाराज घुंमरे सावंगी नाशिक यांच्या माध्यमातून सात दिवसाची सेवा मोठ्या उत्साहात पार पडली ज्या भाविकांनी भागवत कथा श्रवण केली त्या भाविकांचे कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन घुमरे महाराज म्हणाले) काल्याचे किर्तन अरूणाथगिरिजी महाराज यांच्या अमृत वाणीतून संपन्न झाले.






# जैन वाचनालयाने केला महिला पोलीस कर्मचाऱ्यांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**बी. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** तालुक्यातील बोरी येथील कै. जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधून८ मार्च रोजी बोरी पोलीस ठाण्यातील ६ महिला कर्मचाऱ्यांचा सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. बोरी पोलीस ठाण्यात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जैन वाचनालयाच्या अध्यक्षा सौ. मीना जैन होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून बोरी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सुनील गोपीनवार, पोलीस उपनिरीक्षक विजय पंतोजी, वाचनालयाचे संचालक पवन ओझा, बालप्रसाद सोमाणी, सूर्यप्रकाश सोनी हे उपस्थित होते.दरवर्षी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान जैन वाचनालय गेल्या पाच वर्षापासून करीत आलेले आहे.



याआधी ग्रामीण रुग्णालयातील परिचारिका, अंगणवाडीतील अंगणवाडीताई, विविध शाळांतील शिक्षिकाआदींचा जैन वाचनालयाने सन्मान केला आहे. यावर्षी आपले कुटुंब सांभाळून जनतेच्या रक्षणाची तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्याची जिम्मेदारी उत्कृष्टपणे पार पाडल्याबद्दल बोरी पोलीस ठाण्यातील महिला पोलीस शिवनंदा फोले, रूपाली फुलारी, गोखर्णा डुब्बे यांचा वाचनालयाच्या संचालिका सौ.मिना जैन, सौ. प्रतिभा ओझा, सौ. सुनीता सोनी यांनी डिजिटल सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचनालयाचे ग्रंथपाल नेमीनाथ जैन यांनी केले.

# सरस्वती शिशुमंदिर प्राथमिक विद्यालयात जागतिक महिलादिन

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** औचित्य साधून, सरस्वती शिशु मंदिर प्राथमिक विद्यालय मुखेड येथे छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शाळेच्या कर्तव्यदक्ष मुख्याध्यापिका सौ. संगीता बालाजीराव रणभिडकर तसेच कु. पूजा दमकोंडवार, आमच्या शाळेच्या सेविका श्रीमती कमलबाई गजलेवाड मावशी तसेच बालवाडी विभागाच्या सौ.अश्विनी अशोक गेडेवाड बाई व सौ. सविता मनोज गंदपवाड या सर्व कर्तव्यदक्ष महिला कर्मचारी व शिक्षिका व कर्तव्यदक्ष मुख्याध्यापिका सौ संगीता बालाजीराव रणभिडकर यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी आपले मनोगत व्यक्त करताना पौराणिक, आधुनिक महिला शक्ती, सशक्तीकरण, सबलीकरण या सर्वांबद्दल खुप छान माहिती सांगितली. याप्रसंगी बोलताना बालाजी तलवारे म्हणाले की, "यत्र नार्यस्तू पुज्यंत्ये रमंते तत्र देवता" या श्लोकाप्रमाणे आपल्या शाळेत देखील महिलांचे प्रमाण जास्त आहे त्यामुळे आपल्या शाळेतही वेळोवेळी महिला कर्मचाऱ्यांचे पूजन केले पाहिजे.




आपल्या हातून नेहमी विद्यार्थ्यांच्या हिताचे कार्य घडत राहो. सतत विद्यार्थ्यांच्या हितासाठी आपले लक्ष राहो "कार्य मग्नता ही जीवन व्हावे, मृत्यू ही विश्रांती "जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून याप्रसंगी सर्व महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान शाळेचे सहशिक्षक बालाजी निवृत्तीराव तलवारे यांच्या वतीने करण्यात आला. सर्व महिलांना मुलींना जागतिक महिला दिनाच्या खुप खुप शुभेच्छा देऊन सर्वांना खाऊ वाटप करण्यात आले आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# बरबडा येथील मोहन मदेवाड यांना डॉक्टरेट पदवी प्रदान



आधुनिक केसरी न्यूज

**तानाजी शेळगांवकर**

**नायगाव :** तालुक्यातील बरबडा येथील मोहन मदेवाड यांना भारत सरकारच्या जागतिक संस्कृती आणि पर्यावरण संरक्षण आयोगामार्फत मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे. परमपूज्य स्वामी महामंडलेश्वर कौशलेंद्र गिरीजा प्रयागराज, राकेश बेदी, कर्नल तेजेंद्रपाल त्यागी ह्यांच्या हस्ते त्यांना ही पदवी प्रदान करण्यात आली असून,५ मार्च रोजी नेहरू सभागृह, प्रधानमंत्री संग्रहालय नवी दिल्ली येथे हा सोहळा पार पडला. भारत सरकारच्या (वर्ल्ड कल्चरल अँड इनव्हरायमेंट प्रोटेक्शन कमिशन) मार्फत वर्ल्ड कल्चरल अँड इनव्हरायमेंट प्रोटेक्शन कमिशनचे कायम सदसत्व देखील प्रदान त्यांना प्रदान करण्यात आले आहे. दरम्यान मोहन यशवंतराव मदेवाड यांनी कृषी क्षेत्रामध्ये सेंद्रिय शेतीसाठी महाराष्ट्रासह इतर राज्यात देखील हजारो शेतकऱ्यांना विशेष मार्गदर्शन व सहाय्य केले आहे. तसेच सेंद्रिय शेतीसाठी विशेष प्रोत्साहन व तंत्रज्ञान देण्याचे काम देखील ते मागील 22 वर्षापासून करीत आहेत यातूनच स्वस्थ भारताचे (हेल्दी इंडिया) स्वप्न साकार होण्यास मदत होणार असून त्यांना या कामाची दखल घेऊन ही पदवी प्रदान करण्यात आली आहे.मोहन मदेवाड यांचं बरबडा येथील अभ्यासिकेला देखील मोठ योगदान आहे. मुलांना अभ्यासासाठी पुस्तके ते दरवर्षी देत असतात.ते नायगाव पंचायत समितीचे माजी सदस्य यशवंत मदेवाड यांचे सुपुत्र तर खा.अशोकराव चव्हाण यांचे कट्टर समर्थक असलेले बरबडा नगरीचे माजी सरपंच बालाजीराव मदेवाड यांचे पुतणे आहेत.

# रेशन कार्डधारकांना केवायसी करून द्यावी; पुरवठा अधिकारी साबळे

## मोबाईल ॲपद्वारेही करता येईल ई-केवायसी

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** अन्नसुरक्षा योजना अंतर्गत गरीब गरजूंना मोफत रेशन व स्वस्त धान्याचा पुरवठा होतो त्या योजनेचा लाभ घेणाऱ्या शिधापत्रिकाधारकांना सरकारने ई-केवायसी करण्याची अट घातली होती. या योजनेतील बनावट लाभार्थ्यांना शोध ई- केवायसीतून लागणार आहे. ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी 28 फेब्रुवारी 2025 पर्यंत मुदत होती परंतु अनेक कार्डधारकांनी ई-केवायसी न केलेल्याने 30 मार्च 2025 पर्यंत परत एकदा सरकारने मुदत वाढ देण्यात आली असल्याचे माहिती सोयगाव तहसीलचे पुरवठा अधिकारी काकासाहेब साबळे यांनी सावळदबारा येथे रेशन दुकाणात येईल माहिती दिली. या अगोदर अनेक वेळा ई केवायसी करण्यासाठी सरकारने मुदत वाढवून देण्यात आली होती. तरीपण शिधापत्रिकेतील सर्व सदस्यांनी आज तगायत ई केवायसी पूर्ण न केल्याने परत एकदा सरकारने ई केवायसी करण्यासाठी मुदत वाढ देण्यात आली असल्याचे काकासाहेब साबळे पुरवठा अधिकारी सोयगाव यांनी सांगितले.तर 30 मार्च 2025 पर्यंत ई केवायसी करून घ्यावी.



राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत स्वस्तातील व मोफत धान्य मिळवण्यासाठी सर्व सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरात रेशन कार्ड धारकांना व ऑनलाइन असलेल्या रेशनकार्डातील प्रत्येक सदस्याचे ई केवायसी करण्यासाठी सरकारने बंधन घातले आहे. अन्न आणि सार्वजनिक मंत्रालयाने यापूर्वी अनेक वेळा निर्देश दिले आहेत. मात्र तरीदेखील अनेक शिधापत्रिका धारकांनी ई-केवायसी प्रकिया पूर्ण केली नाहीं त्यामुळे 30 मार्च 2025 पर्यंत आपापल्या रेशन दुकानात जाऊन शिधापत्रिकेतील सर्व सदस्यांनी ई केवायसी करून घेणे आवश्यक आहे तसेच मोबाईल ॲपद्वारे या दोन्ही प्रकारे ई केवायसी करता येईल त्यासाठी केंद्र सरकारने मेरा ई केवायसी मोबाईल ॲप सुरू करण्यात आले आहे तरी या याचा वापर करण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून मेरा ई केवायसी मोबाईल ॲप डाऊनलोड करून इन्स्टॉल करून घ्यावे व आधार फीस आरडी सर्व्हिस ॲप सोयगाव तालुक्यातील प्रत्येक स्वस्त धान्य दुकानातील ई-पॉश मशिनद्वारे व मोबाईल ॲप द्वारे प्रत्येक शिधापत्रिका चालक आणि कुटुंबातील सदस्यांची केवायसी करून घ्यावी फक्त आधार क्रमांक टाकून हि प्रक्रिया पूर्ण केली जाते. हि प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या लाभार्थ्यांचे रेशन बंद होऊ शकते व रेशन कार्डातून नाव वगळण्याची शक्यता आहेत जर ई केवायसी नाही केली तर याची सर्वस्वी जबाबदारी कार्डधारकांची असणार आहे. त्यामुळे 30 मार्च 2025 पर्यंत सर्व शिधापत्रिका धारकांनी सर्व सदस्यांचे ई-केवायसी करून घ्यावे, असे आवाहन काकासाहेब साबळे यांनी केले आहे.

डाऊनलोड वरून इन्स्टॉल करून घ्यावे त्यानंतर मेरा ई केवायसी मोबाईल ॲप उघडल्यानंतर त्यामध्ये राज्य निवडून व ठिकाण टाकावे त्यानंतर आधार क्रमांक टाकल्यानंतर ओटीपी मोबाईलला प्राप्त होईल सदर ओटीपी रखण्यात टाकावा सदर सर्व माहिती भरल्यानंतर सबमिट बटनला क्लिक करावे त्यावेळी मोबाईल स्क्रीनवर दिसणारी माहिती सबमिट करावी अशी माहिती सोयगाव तहसीलदार मनीषा मेने यांच्या तहसील कार्यालयाकडून पत्रकार द्वारे करण्यात आली आहे जर शिधापत्रिका धारकांनी ई–केवायसी नाही केली तर रेशनचे धान्य मिळणार नाही तसेच अशा शिधापत्रिका धारकांची नावेही रेशन कार्डामधुन वगळले जाणार आहेत तर शिधापत्रीकेत नावे असलेल्या प्रत्येक सदस्याने आपल्या क्षेत्रातील रास्त भाव दुकानात जाऊन आधार कार्ड घेऊन ई–केवायसी करुन घ्यावी किंवा मोबाईल ॲप द्वारे करून घ्यावी .

**काकासाहेब साबळे, सोयगाव पुरवठा अधिकारी**



# राज्य पत्रकार संघाच्या वतीने कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने समाजातील कर्तुत्ववान महिलांचा सन्मान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर च्या वतीने शनिवारी (दि.८) मान्यवरांच्या उपस्थितीत आय एम ए हॉल, शनी मंदिरजवळ छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आला.
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात पोलीस निरीक्षक प्रवीणा यादव, प्रादेशिक परिवहन अधिकारी पूजा वानखेडे, वरिष्ठ पत्रकार मधुकर अण्णा वैद्य, पत्रकार डॉ. आरती श्यामल जोशी, लेखिका व समाजसेविका जयश्री एस. भगत, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मराठवाडा अध्यक्ष अनिल सावंत, जिल्हाध्यक्ष छबुराव ताके यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.
या सन्मान सोहळ्याचे प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे ज्ञानेश्वर खंदारे, तर सन्मान सोहळ्याचे सूत्रसंचालन पत्रकार सचिन लिला सुखदेव अंभोरे व कर्तृत्ववान महिलांचा परिचय प्राची प्रशांत सूर्यतळे यांनी केले. यावेळी ग्रामीण जिल्हा अध्यक्ष शांताराम मगर, मनोज पाटणी, प्रशांत सूर्यतळे, सुजित ताजने , महेंद्र डेंगळे, विशाल सोनवणे, यांनी पुढाकार घेतला. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे महानगर अध्यक्ष उमेश जोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**यांचा झाला सन्मान :** तेजश्री दिलीप पाचपुते, निर्मला निंभोरे, प्रविणा ताराचंद यादव, लता जाधव, डॉ . अर्चना चंद्रकांत गणवीर, ॲड . स्मिता प्रल्हाद जोंधळे, निता गंगावणे, सरला राजेश सदावर्ते, भाग्यश्री अण्णासाहेब जगताप, विद्या गावंडे, ॲड . प्रतिभा चौतमोल, दिव्या रमेश इंगळे, डॉ . सुषमा उन्मेष शिंदे, पृथा वीर, जयश्री एस . भगत, उज्ज्वला सुभाष साळुंखे, योगेश्वरी बाबुलाल बोहरे, डॉ . वर्षाराणी इंदानी–खोचे, अनु गंगाराम चव्हाण, कविता वाघ घुगे, पूजा वानखेडे, योगिता कृष्णा शिंदे, मनिषा वाघमारे, अनिता ज्ञानदेव फसाटे, सविता रत्नाकर कुलकर्णी,कल्पना इंद्रसिंग राजपूत, प्रा . भारती भांडेकर विश्वास . प्रमिला मुसळे, शुभलक्ष्मी महिला बचत गट शिवाजीनगर, उमा फुलारी, सीमा पाटील, चारुशीला, पत्रकार कल्याणी नागोरे आदी महिलांचा सन्मान करण्यात आला .

# जांभळी येथे आरोग्य शिबिरास प्रतिसाद

## जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या हस्ते आयुष्यमान कार्डचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** जागतिक महिला दिन च्या दुसर्या दिनी तालुक्यातील जांभळी तांडा येथे दि.९ मार्च रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संगीता देशमुख व तालुका आरोग्य अधिकारी डॉ संदेश जाधव यांच्या सुचनेनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र भोसी अंतर्गत पांडुरणा उप आरोग्य केंद्राच्या वितीने आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात ले होते. पांडुरणा उप केंद्रा अंतर्गत येणाऱ्या व अतिशय दुर्गम आणि डोंगराळ भागात असलेले जांभळी ह्या गावात आरोग्य सुविधा उपलब्ध नसल्याने शेतकरी व कामगार नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातुन जिल्हा आरोग्य अधिकारी संगीता देशमुख यांच्या सुचनेनुसार तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संदेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्याची जांभळी या गावामध्ये मा.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख मॅडम व तालुका आरोग्य अधिकारी डॉ संदेश जाधव सर यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरामध्ये महिला दिनाच्या औचित्य साधून महिलांची विशेष आरोग्य तपासणी करण्यात आली या मध्ये गरोदर माता,स्तनदा माता,एन.सी.डी.स्क्रीनिंग,सिकल सेल,एच.बि टेस्ट, एच.आय. व्हि व ईतर सर्व रक्त तपासण्या करण्यात आल्या व जवळपास ३० नागरिकांचे आयुष्यमान योजनेचे कार्ड काडुन जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.
या शिबिरात प्रा.आरोग्य केंद्राच्या आरोग्य अधिकारी डॉ.शिवानी राठोड व पांडुरणा आरोग्य उप केंद्राचे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ जगदीश राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य सेविका जाधव बी एस,आरोग्य सेवक साईनाथ माकूरवार व उपकेंद्र पांडूर्णा सर्व टिम यांनी तपासणी केली.
हे शिबीर यशस्वी करण्यासाठी सर्व आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, लॅब असिस्टंट,आशा वर्कर, अंगणवाडी सेविका,व ग्रामपंचायत जांभळी यांनी मोलाचे परिश्रम घेतले.



# सावधान! तापमान वाढतेय वेगाने

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्यातील उष्णतेचा पारा वाढतच चालला असून कमाल तापमानाने पुन्हा एकदा चाळीशी गाठली आहे. राज्यातील सोलापूर येथे कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसवर पोहचले असून विदर्भातील काही शहरांमध्ये पारा चाळीशीच्या जवळ पोहचला आहे. त्यातच आता भारतीय हवामान खात्याने राज्यातील काही शहरांना “येलो अलर्ट” देण्यात आला आहे. विशेषकरून कोकण विभागातील काही जिल्ह्यांना उष्णतेचा “येलो अलर्ट” देण्यात आला आहे. विदर्भातील अकोला आणि ब्रम्हपुरी या शहरांमध्ये अनुक्रमे ३९.५ व ३९.४ अंश सेल्सिअस इतके तापमान रविवारी नोंदवले गेले. तर चंद्रपूर येथेही ३८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली. गोंदिया वगळता उर्वरित शहरांमध्ये तापमान ३३७ अंश सेल्सिअस पलीकडे होते. त्यामुळे येत्या काही दिवसात तापमानाचा पारा चाळीशी ओलांडेल अशी शक्यता वर्तविण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील काही शहरांत देखील तापमानात वाढ झालेली दिसून येत आहे.



# मुखेड नगर परिषद येथे महिलादिन उत्साहात साजरा

## न. प. संघटनेच्या वतीने महिलांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** नगरपरिषद कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कर्मचारी संवर्ग कर्मचारी संघटनेच्या वतीने नगर परिषद कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी महिलांचा जागतिक महिला दिनानिमीत्त दि.०८ मार्च रोजी जुन्नी नगर पालिका येथील वाचनालयात यथोचित सत्कार करण्यात आले. सदर कार्यक्रमाची सुरूवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन दिपप्रज्वलन करत राष्ट्रगिताने करण्यात आली. त्यानंतर कोमल सुक्ते यांनी सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित एक गीत गायीले. जागतिक आरोग्य संघटनेचे सदस्य तथा प्रसिद्ध सर्पदंश तज्ञ डॉ. दिलीपराव पुंडे हे होते तर उदघाटक म्हणुन पोलीस निरीक्षक लक्ष्मणराव केंद्रे, प्रमुख पाहुणे, डॉ. रचिता कौरवार, जेष्ठ पत्रकार दादाराव आगलावे, ॲड शारदा जाधव, अध्यक्ष महेताब शेख, महाराष्ट्र राज्य नगरपरिषद कर्मचारी, संवर्ग कर्मचारी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष बलभिम शेंडगे, नळ व पाणीपट्टी वसुली विभागप्रमुख सय्यद हाफिज राजे, गोविंदराव पाटील, राजु रोडगे यांची प्रमुख उपस्थिती होते.





# नांदा येथील सामन्यात ओम साईराम क्रिकेट कारेगाव संघाने पटकावले प्रथम बक्षीस

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मोजै नांदा (प.म्है) ज्ञानेश्वर अँड विनायक ग्रुप ऑफ फाउंडेशन च्या वतीने क्रिकेटचे खुले सामने आयोजित करण्यात आले होते. या झालेल्या सामन्यामध्ये कारेगाव येथिल ओम साई राम क्रिकेट संघाने विजयी मिळवत पहिले पारितोषिक जिंकले असून प्रथम पारितोषिक रोख रक्कम २१ हजार रुपये हे नामदेव आयलवाड यांच्या वतिने देण्यात आले तर द्वितीय पारितोषिक ११ हजार रूपये बजरंग दल नांदा पट्टी या संघाने पटकावले असुन द्वितीय बक्षीस माजी.सभापती बाळासाहेब पाटील रावणगावकर यांच्यातर्फे देण्यात आले तर तृतीय बक्षीस ७ हजार रूपये मिलन क्रिकेट संघ म्हैसा या संघाने जिंकले असून सदरिल बक्षीस हे भोजरेड्डी आनेबोईनवाड यांच्यातर्फे देण्यात आले आहे. सर्व बक्षीसे ओ.बी.सी नेते नामदेव आयलवाड, पत्रकार एल.ए.हिरे, पत्रकार सिद्धार्थ जाधव यांच्या उपस्थितीत वितरीत करण्यात आले आहेत. क्रिकेट संघाचे अध्यक्ष संतोष दयलोड, उपाध्यक्ष आकाश लिमकर,शेख अल्मास आदीनी क्रिकेटचे सामने यशस्वी पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

# सद्गुरु अंबादास महाराज संजीवन समाधी उत्सव सोहळ्याची पाळा येथे जय्यत तयारी

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** तालुक्यातील श्री क्षेत्र पाळा येथील सद्गुरु अंबादास महाराज मठ संस्थान येथे सद्गुरु अंबादास महाराज संजीवन समाधी सोहळा बुधवार दि. 12 ते दि. 19 मार्च या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त सप्ताह आयोजित करण्यात आला आहे.

मुखेड तालुक्यातील श्रीक्षेत्र पाळा येथे शक्त्युपासक संजीवन समाधीस्थ श्री सद्गुरु अंबादास महाराज मठ संस्थान आहे. या संस्थानात सद्गुरु अंबादास महाराज यांचा 133 वा समाधी सोहळा बुधवार दि. 12 मार्चपासून सुरू होणार आहे. या सप्ताहाचा समारोप बुधवार दिनांक 19 मार्च 2025 रोजी केला जाणार आहे. उत्सव काळात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. काकडा आरती, श्री ज्ञानेश्वरी पारायण, श्री ची पूजा, श्री तुकाराम महाराज गाथा भजन, प्रवचन, हरिपाठ, श्रीजी प्रदोष पूजा, हरिकीर्तन आदी कार्यक्रमाचे आयोजन नियमित करण्यात आले आहे. बुधवारी दि. बारा रोजी सप्ताह प्रारंभ होणार आहे. सोमवारी दि. 17 रोजी पूर्व आराधना कार्यक्रम आहे. मंगळवार दिनांक 18 रोजी उत्तर आराधना कार्यक्रम आहे. बुधवारी दिनांक 19 मार्च रोजी श्रीजी पालखी मिरवणूक व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताह कालावधीत सर्व श्री ह.भ.प. वासुदेव महाराज कोलंबीकर, उल्हास महाराज सूर्यवंशी आळंदी, केशव महाराज मुळीक आळंदी, ज्ञानेश्वर महाराज जोशी पुणे, नारायण महाराज पालमकर, गुरुवर्य चंद्रशेखर महाराज देगलूरकर, सद्गुरु कालिदास महाराज पाळेकर यांच्या कीर्तनाचा सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

सप्ताह कालावधीत श्री आनंदी महाराज पाळेकर, श्री अवधूत महाराज टाकळीकर, सुदर्शन शास्त्री बेलगावकर, श्री बाळू गुरु असोलेकर, श्री विश्वास शास्त्री घोडसकर, श्री प्रसाद महाराज हैदराबाद, श्री योगेश्वर महाराज बेटमोगरेकर, श्री अनिरुद्ध महाराज बाराळीकर, श्री प्रबोधन महाराज पाळेकर यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. मंगळवार दिनांक 18 रोजी श्री यज्ञेश्वर महाराज दीक्षित यांचे नारदीय कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.

बुधवार दिनांक 19 रोजी श्री एकनाथ महाराज पाळेकर यांचे काल्याचे किर्तन आयोजित करण्यात आले आहे. श्री श्री श्री माधवानंद सरस्वती स्वामी महाराज यांचे पाळा येथे आगमन बुधवार दिनांक 12 मार्च रोजी होणार आहे. वार्षिक संजीवनी समाधी उत्सव सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री कालिदास महाराज पाळेकर, श्री प्रबोधन महाराज पाळेकर, श्री एकनाथ महाराज पाळेकर यांनी व पाळा ग्रामस्थांनी केले आहे. सद्गुरु अंबादास महाराज संजीवन समाधी सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

# दारुच्या नशेत नियंत्रण कक्षाला खोटी माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** दारुच्या नशेत पोलीस नियंत्रण कक्षाला खोटी माहिती देऊन दिशाभूल करणाऱ्या एकाविरुद्ध वारजे पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याप्रकरणी निवास नारायण अकोले याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वारजे भागातील रामनगर परिसरात एका महिलेवर अत्याचार करण्यात आल्याची खोटी माहिती अकोले याने पोलीस नियंत्रण कक्षाला (११८) दिली. या घटनेची माहिती नियंत्रण कक्षाला रविवारी दुपारी मिळाली.

# अपात्र सरपंच पुत्राची तक्रारदारास मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**संभाजी लांडे**

**वडवणी :** सरपंच अपात्रतेसाठी तक्रार का केली, याचा राग मनात धरून सरपंच पुत्र विलास सावंत आणि त्यांचा इतर पाच साथीदारांनी मिळून ७ मार्च रोजी रात्री साडेसात वाजता तक्रारदाराच्या घरी जाऊन शिवीगाळ व मारहाण केल्याप्रकरणी सरपंच पुत्रासह सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. काही दिवसांपूर्वीच पुसरा येथील सरपंच कांताबाई सावंत यांना आयुक्तांच्या आदेशानुसार अपात्र केले होते. यात तक्रारदार सदस्यांमध्ये मिरा बळीराम नाईकवाडे यांचा समावेश होता. त्यामुळे सरपंचांना अपात्र करण्यासाठी अर्ज करतोस का, अशी कुरापत काढत सरपंच पुत्र विलास सावंत व इतरांनी बळीराम नाईकवाडे यांच्याकडे जाऊन शिवीगाळ केली. यावेळी भांडणाचा आवाज ऐकून बळीरामचा भाऊ महादेव नाईकवाडे घराबाहेर आले. भांडण का करता, अशी विचारणा करताच नाईकवाडे यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. तसेच डोक्यात व बरगडीवर चाकूचे वार करुन जखमी केले. तसेच घरच्यांनाही शिवीगाळ करत मारहाण करण्यात आली. या घटनेनंतर जखमी महादेव नाईकवाडे यांना तातडीने बीड येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी पाठवण्यात आले. तेथे औषधोपचार करण्यात आले. याप्रकरणी महादेव नाईकवाडे यांच्या फिर्यादीवरून विलास सावंत आणि इतर पाच जणांविरुद्ध वडवणी पोलिस ठाण्यात ८ मार्च रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याप्रकरणाचा तपास वडवणीचे पोलिस अधिकारी करीत आहेत.

# कदम पाटील पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**तानाजी शेळगांवकर**

**नायगाव :** कदम पाटील पब्लिक स्कूल सोमठाणा येथे सांस्कृतिक कार्यक्रम दि. 9 रोजी आनंदाच्या वातावरणात संपन्न झाला. अध्यक्षस्थानी चोपडे शेषेराव (कवी व सुप्रसिद्ध लेखक) हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून गजानन शिंदे (संचालक, शिवराजमुद्रा अ. बँ. लि. मारतळा), संभाजी तोडे (संचालक, मातोश्री इंग्लिश स्कूल अंतरगाव), पत्रकार तानाजी शेळगावकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी कृष्णूर, हिप्परगा (जा.), सोमठाणा, नरंगल, रानसुगाव, सुगाव ता. लोहा, अंचोली येथील पालकवर्ग, सरपंच, उपसरपंच, चेअरमन व आदी प्रतिष्ठित मान्यवर कार्यक्रम पाहण्यासाठी उपस्थित होते. देवा गणेशा, दैवत छत्रपती, माऊली माऊली, रामलीला, लावणी, कोळी गीत यावर आधारित विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट असे नृत्य सादर केले. जैसी करनी वैसी भरणी हे नाटक विद्यार्थ्यांनी



सादर केले व तसेच यासारखे विविध कार्यक्रम सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून ही शाळा प्रयत्नशील असते. संस्थेचे अध्यक्ष प्रा. विठ्ठल कदम सरांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पालकांचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापिका सौ. ज्योती कदम, भुजंग शिंदे, पल्लवी, जयश्री, पूजा व अन्य शिक्षकांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन हरपाळ हंबर्डे व योगेश हसनाळे यांनी केले.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# बाबासाहेब आकात स्मृती पुरस्काराचा मनस्वी आनंद वाटतो : मकरंद अनासपुरे

## परतूरमध्ये स्व. बाबासाहेब भाऊ आकात स्मृती पुरस्काराचे थाटात वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** स्व. बाबासाहेब भाऊ आकात यांनी शैक्षणिक, सहकार व सामाजिक क्षेत्रात केलेले काम मला भावले. त्यामुळे हा पुरस्कार मिळाल्याचा मनस्वी आनंद वाटतो असे प्रतिपादन प्रसिद्ध चित्रपट अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी केले.

येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाच्या प्रांगणात रविवारी (दि. ९) अभिनेते मकरंद अनासपुरे यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते स्व. बाबासाहेब भाऊ आकात स्मृती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव कपील आकात हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक प्रा. डॉ. रणजितसिंह निंबाळकर,विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. दासू वैद्य, विद्यापीठ व्यवस्थापन समितीचे सदस्य प्रा. डॉ. भागवत कटारे, प्रा. डॉ. शिवाजी मदन,संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती आशाताई आकात,विलासराव आकात,प्रा.डॉ.भास्कर साठे,प्रा. डॉ. मुंजा धोंगडे,प्राचार्य डॉ. भारत खंदारे,डॉ. कुणाल आकात, वर्षाताई आकात, भक्तीताई आकात यांची उपस्थिती होती.

अनासपुरे पुढे म्हणाले की,बाबासाहेब भाऊंनी शैक्षणिक, सहकार व सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याने मी प्रभावीत झालो. भाऊंचे कार्य माझ्या मनाला भावले. आणि मी हा पुरस्कार स्वीकारण्यास थेट परतूरला आलो. परंतु हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नाही तर त्यात अनेकांचा सहभाग आहे.जीवनात माणुसकी महत्वाची आहे.मराठी भाषा समृद्ध आहे. मराठीचे श्रेष्ठत्व आपण सर्वांनी जपले पाहिजे. भाषेमुळे माणूस मोठा होतो माणसामुळे भाषा नव्हे असेही अनासपुरे म्हणाले. मराठवाड्याच्या मातीतून आणखी चांगले कलावंत घडावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी सिने अभिनेते मकरंद अनासपुरे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार, मानपत्र, स्मृतीचिन्ह देऊन कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाला परतूर, मंठा परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अशोक गारकर व प्रा. डॉ. शरद बोराडे यांनी संपादित केलेल्या व भाऊंच्या जीवनकार्याला उजाळा देणाऱ्या ' आठवणीतले भाऊ ' या स्व. बाबासाहेब भाऊ आकात स्मृती विशेषकांचे विमोचन अभिनेते मकरंद अनासपुरे, कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी, कपिल भैया आकात व मंचावरील सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



कुलगुरू प्रा . डॉ . विजय फुलारी म्हणाले की, बाबासाहेब भाऊंचे कार्य उल्लेखनीय असेच आहे . अभिनेते मकरंद अनासपुरे यांचे कार्यही मोठे आहे . सिनेक्षेत्रासह नाम फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या कामामुळे महाराष्ट्राची मान निश्चितच उंचावली आहे . अनासपुरे यांनी विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागास भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे तसेच कपील भैया आकात यांनी विविध शाळांच्या विद्यार्थ्यांना एकत्रित करून सांस्कृतिक कार्यक्रम घ्यावा . विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव द्यावा .त्यातून कलावंत घडण्यास मोठी मदत होईल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली .

यावेळी कवी दासू वैद्य यांनी अभिनेते अनासपुरे यांच्या जडणघडणीबद्दल सांगताना त्यांच्या बालपणीच्या अनेक आठवणींना उजाळा दिला .तसेच अनासपुरे यांनी प्रतिकूल परिस्थितीशी झगडत मिळविलेल्या यशाचे कौतुक केले . प्रास्ताविक करताना कपील आकात म्हणाले की, भाऊंच्या निधनानंतर आमच्या परिवारावर दु :खाचा डोंगर कोसळला . परंतु आमच्या कुटुंबावार प्रेम करणाऱ्या अनेकांनी आम्हाला दिलासा दिला . शिक्षण संस्था आमचे कुटुंब आहे . भाऊंचे सहकारी, मित्रपरिवार, नातेवाईक यांनी प्रेम दिले . त्यामुळे आम्हाला काम करण्याची ऊर्जा मिळाली .



# परतूरच्या तहसीलदारांना धक्काबुक्की करणारे आरोपी अखेर जेरबंद

## 33 लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जेसीबी, हायवा, एक्सयुव्ही 500 कार केली जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**परतुर :** प्रतिभा गोरे तहसिलदार परतूर ह्या त्यांचे खाजगी वाहन क्रमांक MH-22 AW-9305 ने अवैद्य गौण खनिज उत्खनन प्रतिबंधात्मक कारवाही करिता गस्तवर असताना रात्री 12.50 वाजेचे सुमारास इंदिरानगर परतुर च्या पुढे आंबा रोडच्या डाव्या बाजूला गेले असता एक जेसीबीने हयवा मध्ये काही लोक हे मुरूम भरताना दिसल्याने त्यास पकडण्यासाठी गेले असता त्यांनी जेसीबी घेऊन पळ काढला. त्यांचा पाठलाग करून पारडगाव रोडला JCB पकडला असता तेथे इसम नामे 1)अखिल बिल्डर, 2) इलियास कुरेशी, 3) अमजद कुरेशी, 4) इरफान युनूस शेख, 5) जुनेद यांनी त्यांचा फोन हिसकावून घेऊन शिवीगाळ व धक्काबुक्की करून शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला होता.

सदर प्रकरणांमध्ये तहसीलदार परतुर यांनी दिलेल्या तक्रारी वरून गुन्हा नोंद करून तपासाची चक्र परतुर पोलीसानी तत्काळ फिरवून यातील 5 आरोपीस तात्काळ 24 तासाच्या आत अटक करून त्यांच्याकडून एक JCB, किँमत 12 लाख, एक हायवा किँमत 15 लाख , आरोपीने गुन्ह्यात वापरलेली XUV 500 कार किँमत 6 लाख असा एकूण -33 लाख चा मुद्देलमल जप्त करण्यात आला आहे. तीन आरोपीस तीन दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे. 2 आरोपीस PCR साठी आज रोजी मा. कोर्ट मध्ये हजर करणार आहेत, सदर आरोपी यांच्याविरुद्ध हद्दपारीची कार्यवाही करून तडीपार करण्यात येणार असल्याचे पोलिस निरीक्षक, एम. टी. सुरवसे यांनी कळविले असून यापुढे असा प्रकार करणाऱ्याची हिंमत होणार नाही अशी कारवाही करण्यात येणार असल्याचे कळवले आहे. सदरची कारवाई ही अजय कुमार बंसल, साहेब, पोलिस अधीक्षक जालना, आयुष नोपाणी, साहेब, अप्पर पोलिस अधी्षक जालना, दादहरी चौरे, साहेब, उप विभागीय पोलिस अधिकारी, परतूर यांच्या मार्गदर्शनाखाली परतूर पोलिसांनी केली आहे.

# डोणगावातील आठवडी बाजारात नऊ दुकानांना आग; वीस लाखांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुल आबेद्दीन**

**डोणगाव :** आठवडी बाजारात नेहमी मोठी वर्दळ असते आठवडी बाजारात मोठ्या प्रमाणात भाजीपाला जनरल स्टोअर व फळांचे दुकाने एकमेकांना लागून आहे ग्रामपंचायतच्या वतीने या दुकानांना बसण्यासाठी ओट्यांची व्यवस्था ही करण्यात आली आहे त्या ओट्यावर भाजीपाल्याची तसेच जनरल स्टोअर व फुलांची दुकाने आहेत . रोजच्या दिनक्रमाप्रमाणे दुकानदार आपली दुकाने बंद करून घरी गेले होते रात्री अंदाजे अडीच तीन वाजेच्या सुमारास आठवडी बाजारातून दूर निघत असल्याचे पोलीस स्टेशन जवळ हॉटेल चालवत असलेला एका युवकाला दिसून आले धूर निघत असल्याचे दिसताच त्यांनी आपल्या मित्रमंडळींना व पोलिसांना फोन लावून आठवडी बाजारात धुर निघत असल्याचे सांगितले , पोलिसांनी व युवकांनी घटनास्थळी धाव घेत डोणगाव येथील अग्निशामन दल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुनील आखाडे यांना आग लागल्याची माहिती दिली घटनेची माहिती मिळतात आखाडे हे आपले पाण्याचे टँकर घेऊन आले. भीषण आगीला आटोक्यात आणण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले व पुढील दुकानांना लागणाऱ्या आगीला आटोक्यात आणण्याचे यश आले सुदैवाने यात कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही मात्र नऊ दुकानातील सर्वच साहित्य जळून खाक झाले.या आगीत डोणगाव येथील शेख शौकत शेख सोनाजी बागवान , शकील शहा महबूब शहा , शांताबाई पांडव विनोद अशोक वाघमारे गणेश अशोक वाघमारे शेख रहीम लक्ष्मण दत्तात्रय महापुरे व विषयक इब्राहिम शेख संदलजी या नऊ दुकानदाराचे अंदाजे 20 लाख 21 हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच तहसीलदार निलेश मडके व डोणगाव मंडळाचे तलाठी घटनास्थळी पोहोचून पाहणी करून पंचनामा केले यावेळी माझी जिल्हा परिषद सभापती राजेंद्र पळसकर शैलेश भाऊ सावजी निंबाजी पांडव नागरिक उपस्थित होते.





# बौद्ध महासभा तालुकाध्यक्षपदी प्रदीप जोंधळे

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हामदे**

**उमरी :** भारतीय बौद्ध महासभेच्या उमरी तालुकाध्यक्षपदी आयु प्रदीप गंगाराम जोंधळे सर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तर सरचिटणीसपदी डॉ. श्याम तुपसाखरे. व कोषाध्यक्षपदी एन. एम. कांबळे याची निवड झाल्या बद्दल या सर्वांना शुभेच्छा देण्यात आल्या. भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष गणपत गायकवाड, जिल्हा सरचिटणीस दामोदर सरकटे, उमरी संघटक प्रभारी माने कुमार स्वामी, संघटक प्रभारी सा. ना. भालेराव, माण् प्राचार्य ए. एस. जाधव , डी जी तूपसाखरे. एन बी जोंधळे, सुरेश हनवते, राजेश सवई, संदीप गोवंदे, महेंद्र कांबळे, नितीन वाघमारे, त्रिरत्न सवई, ज्ञानेश्वर तूपसाखरे, बालाजी देवके, सोनु भाऊ वाघमारे, व सर्व समाज बांधव आदी उपस्थित होते. भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष गणपत गायकवाड सर जिल्हा सरचिटणीस दामोदर सरकटे, उमरी संघटक प्रभारी माने कुमार स्वामी.संघटक प्रभारी सा ना भालेराव. मा प्राचार्य ए. एस. जाधव, डी. जी. तूपसाखरे. एन. बी. जोंधळे, सुरेश हनवते, राजेश सवई, संदीप गोवंदे, महेंद्र कांबळे, नितीन वाघमारे, त्रिरत्न सवई. ज्ञानेश्वर तूपसाखरे. बालाजी देवके. सोनु भाऊ वाघमारे. व सर्व समाज बांधव आदी उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in